**आरबीआय/२०११-१२/९८**

**डीजीबीए.जीएडी.क्र.एच.०१ /३१.०५.००१/ २०११-१२** **जुलै १, २०११**

सर्व एजन्सी बँका

माननीय महोदय,

**महापरिपत्रक-एजन्सी बँकांद्वारे निवृत्तीवेतनाचे वाटप**

भारतीय रिझर्व्ह बँक एजन्सी बँकांनी सरकारी निवृत्तीवेतनाचे वाटप करण्याबाबत विविध सूचना निर्गमित करीत आली आहे. या सूचना आमच्या महापरिपत्रक आरबीआय/२००८-०९/८२ (डीजीबीए.जीएडी.क्र. एच-०९/३१.०५.००१/२०१०-११), दिनांक जुलै १, २०१० द्वारे कळविण्यात आल्या होत्या. आता आम्ही या विषयावर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या महत्त्वाच्या सूचना अंतर्भूत केलेले जून ३० २०११ अद्यतन महापरिपत्रक सोबत जोडत आहोत. तुम्ही पत्रक आमच्या www.mastercirculars.rbi.org.in . या वेबसाइटवर ही पाहू शकता.

२. कृपया पोंच द्यावी.

आपला विश्वासू

(बी. के. मिश्रा)
उप महाव्यवस्थापक

जोडपत्र : पुढीलप्रमाणे

इस विभाग को आय.एस.ओ. ९००१२००० प्रमाणपत्र मिला है।
सरकारी और बैंक लेखा विभाग, केन्द्रीय कार्यालय, भायखला ऑफिस बिल्डिंग, ४ थी मंजिल, मुंबई सेन्ट्रल रेलवे स्टेशन के सामने, भायखला, मुंबई - ४०० ००८
शासकीय व बँक लेखा विभाग मुख्य कार्यालय, केंद्रीय कार्यालय, मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन समोर, भायखळा, मुंबई - ४०० ००८.
या विभागाला आय.एस.ओ. ९००१२००० प्रमाणपत्र मिळाले आहे.
दुरध्वनी क्र.: (०२२)२३०८ ४१२१ फॅक्स नं. (०२२) २३००० ३७०/२३०१ ६०७२/२३०१ ००९५, ई.मेल : cgmicdgbaco@rbi.org.in
हिन्दी आसान है, इसका उपयोग बढाइए।

## महापरिपत्रक – एजन्सी बँकांद्वारे निवृत्तीवेतनाचे वाटप

**सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत निवृत्तीवेतनाच्या प्रदानासाठी विविध योजनांखाली सरकारी निवृत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतनाचे प्रदान**

### १. परिचय

निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाचे प्रदान संबंधित मंत्रालये / विभाग यांनी लेखा महानियंत्रक, वित्त मंत्रालय, भारत सरकार किंवा राज्य सरकारे यांच्या मंजूरीने तयार केलेल्या संबंधित योजनेने शासित आहे आणि त्यात जेव्हा सरकार जाहीर करील तेव्हा वाढीव महागाई भत्ता आणि अन्य फायदे समाविष्ट आहेत. या संबंधात निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांचा येथे खाली माहितीसाठी सारांश देण्यात आला आहे.

### १. राज्य सरकारी निवृत्तीवेतन धारकांना महागाई भत्ता वगैरे वरील सरकारी आदेश राज्य सरकारांच्या वेबसाइटवर ठेवणे.

**(संदर्भः डीजीबीए.जीएडी.क्र. एच-४१६/४५.०१.००३/२००२-०३ दिनांक मार्च २१, २००३ आणि डीजीबीए.जीएडी.क्र.७७०/४५.०१.००३/२००३-०४ दिनांक फेब्रुवारी २५, २००४)**

महागाई भत्त्या संबंधातील आदेशांचे निर्गमन आणि लाभार्थींना महागाई भत्त्याचे प्रदान यामधील रेंगाळलेला वेळ भरून काढण्यासाठी आणि ज्येष्ठ नागरिकांना तत्पर सेवा पुरविण्यासाठी, असे ठरविण्यात आले आहे कि निवृत्तीवेतन प्रदान करणाऱ्या एजन्सी बँकानी राज्याच्या मुख्यालयातील अधिकृत बँकांच्या मुख्य कार्यालयाना आणि/किंवा विभागीय कार्यालयाना सरकारने पुरविलेल्या आदेशांच्या नकलांवर कारवाई करावी. त्यापुढे असेहि ठरविण्यात आले आहे कि परिपत्रके राज्य सरकारच्या वेबसाइटवर ठेवण्यात यावीत.

सर्व **राज्य सरकारांना** महागाई भत्त्यासंबंधातील सरकारी आदेश इलेक्ट्रॉनिक स्वरूपात तसेच हार्ड कॉपी रिझर्व्ह बँकेला तिच्या वेबसाईट्वर ठेवणे शक्य व्हावे म्हणून पाठविण्याचा पर्याय देण्यात आला आहे.

### २. केंद्र सरकारच्या निवृत्तीवेतन धारकांना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत निवृत्तीवेतनाचे प्रदान- निवृत्तीवेतन धारकांना महागाई भत्त्या(डीआर)च्या प्रदानातील होणारी दिरंगाई कमी करण्यासाठी सरकारने उचललेली पावले-डीआर वगैरे च्या संदर्भातील सरकरी आदेश भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत पुढे पाठविण्याची पध्दत बंद करणे.

**(संदर्भः डिजीबीए.जीएडी.क्र. एच-५०६/४५.०१.००१/२००२-०३ दिनांक एप्रिल १२, २००३)**

महागाई भत्ता वगैरेच्या आदेशाचे निर्गमन आणि लाभार्थींना प्रत्यक्ष प्रदान करण्यातील रेंगाळणारा वेळ भरून काढण्यासाठी आणि ज्येष्ठ नागरिकांना तत्पर सेवा पुरविण्यासाठी, कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तीवेतन मंत्रालय, निवृत्तीवेतन आणि निवृत्तीवेतन धारक कल्याण विभाग, भारत सरकार यांनी खालील पावले उचलली आहेत. :-

१. वित्त मंत्रालयाकडून महागाई भत्त्याच्या सुधारित दरांच्या मंजूरीचे आदेश मिळताक्षणी निवृत्तीवेतन धारकांना सुधारित दराने महागाई भत्त्याच्या प्रदानाचे आदेश निर्गमित केले जातात आणि त्याच्या प्रती सर्व एजन्सी बँकांच्या प्रमुखांना ना ई-मेल तसेच फॅक्सने महागाई भत्त्याच्या तत्परतेने प्रदानासाठी आवश्यक ती कारवाई करण्याच्या सूचनांसह ताबडतोब जातात.

२. कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तीवेतन मंत्रालयाच्या (http://www.persmin.nic.in) या वेबसाइटवर हे आदेश ठेवले जातात.

३. एजन्सी बँकांच्या सर्व प्रमुखांना टपालाने आदेशाच्या प्रती पाठविल्या जातात आणि इंडियन बँकस् असोशिएशन आघाडीच्या वृत्तपत्रात आदेश प्रसिध्द करते.

यापुढे आरबीआय महागाई भत्त्यासंबंधातील सरकारी आदेश एजन्सी बँकांना पाठविणार नाही.

## ३. नमुना 'ए'आणि 'बी' मध्ये नामनिर्देशन स्वीकारणे – केंद्रीय नागरी निवृत्तीवेतन

**(संदर्भः डीजीबीए.जीएडी.क्र. एच-९४/४५.०५.०३१/२००४-०५ दिनांक ऑगस्ट २४, २००४)**

निवृत्तीवेतन धारक आणि त्यांच्या वारसांना तोंड द्यावे लागणाऱ्या गैरसोयी दूर करण्याच्या दृष्टिकोनातून सरकारने असा सल्ला दिला आहे कि, निवृत्तीवेतन प्रदान करणाऱ्या सर्व बँका शाखांनी जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे नमुना 'ए' किंवा 'बी' मध्ये निवृत्तीवेतन धारकांनी त्यांच्या वारसांना निवृत्तीवेतनाची थकबाकी प्रादान करण्यासाठी सादर केलेले नामनिर्देशन स्वीकारावे.

## ४. केंद्रात प्रतिनियुक्तीवर असताना भारत सरकारच्या सेवेतून निवृत्त होणाऱ्या अखिल भारतीय सेवा अधिकाऱ्यांना निवृत्तिवेतन आणि अन्य निवृत्तीच्या लाभांसाठी कार्यपध्दतीची अंमलबजावणी

**(संदर्भः डीजीबीए.जीएडी.क्र.६१२-६४४/४५.०१.००१/२००४-०५ दिनांक ऑक्टोबर ७, २००४)**

केंद्रात प्रतिनियुक्तीवर असताना भारत सरकारच्या सेवेतून निवृत्त होणाऱ्या अखिल भारतीय सेवा अधिकाऱ्यांना निवृत्तिवेतन प्रदान करण्यासाठी खालील प्रमाणे हिशोबाच्या कार्यपध्दतीचे अनुसरण करण्याचा एजन्सी बँकांना सल्ला देण्यात येत आहे. :-

(१) अखिल भारतीय सेवा निवृत्तीवेतन धारकांसाठी पीपीओ क्रमांकात, केंद्रीय नागरी निवृत्तीवेतन धारकांसाठी असलेल्या १२ अंकी घटकाव्यतिरिक्त, निवृत्तीवेतन धारक ज्या सेवेतील आणि राज्य केडरचा आहे ते दर्शविणारे चिन्ह मागे जोडलेले असावे. पंजाब केडरच्या भाससे (आयएएस) अधिकाऱ्यासाठी नमुना पीपीओ क्रमांक असा असेल- IAS/Pb/438840400191.

(२) अखिल भारतीय सेवेतील निवृत्तीवेतन धारकांसाठी केवळ अधिकृत बँकांमार्फत म्हणजेच सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि आयडीबीआय बँक लि., युटीआय बँक लि., आयसीआयसीआय बँका लि., आणि एचडीएफसी लि. या चार अधिकृत खाजगी बँकांतूनच निवृत्तीवेतन प्राप्त करण्याचा पर्याय असेल.

**(सूचना - आयडीबीआय बँकेचे आता सार्वजनिक क्षेत्रातील बँक असे वर्गीकरण करण्यात आले असून युटीआय बँकेचे नाव आता ॲक्सिस बँक ठेवण्यात आले आहे.)**

(३) केंद्रीय नागरी निवृत्तीवेतन धारकांपासून वेगळेपणा दर्शविण्यासाठी सीपीएओ ने निर्गमित केलेली स्पेशल सील ॲथॉरिटी (एसएसए) निळ्या रंगात असेल. त्या व्यतिरिक्त, ज्या राज्य सरकारच्या नावे प्रदान डेबीट होईल ते हि ॲथॉरिटि दर्शवील.

(४) एसएसएची एक प्रत माहिती आणि दफ्तरासाठी संबंधित अकाऊंटंट जनरलकडे पाठविण्यात येईल.

(५) बँकेच्या संबंधित प्रदाता शाखा निवृत्तीवेतन धारकाची ओळख पटविण्यासाठी योग्य त्या कार्यपध्दतीचा अवलंब केल्यानंतर प्रदान मुक्त करील आणि अखिल भारतीय सेवा निवृत्तिवेतन धारकाचे नाव रिझर्व्ह बँक/स्टेट बँक यांच्या, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, प्रतिपूर्ती करणाऱ्या शाखांकडे प्रतिपूर्तीसाठी पाठविण्यासाठी राज्य सरकारच्या निवृत्तीवेतन धाराकांसाठी तयार केलेल्या लेखपट्टिकेवर दाखल करील. अशा लेखपट्टिका केंद्र सरकारच्या नागरी निवृत्तीवेतन धारकांसाठी निवृत्तीवेतन वाटपाच्या सिंगल विन्डो सिस्टीमखाली हाताळल्या जात नसल्याने त्या सीपीएओ ला पाठवू नयेत.

(६) प्रतिपूर्ती करणाऱ्या शाखा राज्य सरकारच्या निवृत्तीवेतन धारकांसाठी असलेली कार्यपध्दती अनुसरतील आणि ॲडव्हाइस रिझर्व्ह बँक, सीएएस, नागपूर यांना आणि तदनुरूप लेखपट्टिका संबंधित अकाऊंटंट जनरलला पाठवतील.

(७) आरबीआय, सीएएस, नागपूर संबंधित राज्य सरकारच्या खात्यातून कार्यपध्दतीनुसार डेबीट करतील.

**५. संरक्षक दलातील निवृत्तीवेतन धारकांना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत निवृत्तीवेतनाच्या प्रदानासाठी योजना - निवृत्तीवेतन प्रदान लेखपट्टिका सादर करण्यातील दिरंगाई आणि खोटी आणि फसवणूकीची प्रदाने टाळणे.**

**(संदर्भः डीजीबीए.जीएडी.क्र.८६७-८९९/४५.०२.००१/२००४-०५ दिनांक ऑक्टोबर १८, २००४)**

असे आढळून आले आहे कि, निवृत्तीवेतन प्रदान करणाऱ्या बँका निवृत्तीवेतन अधिकाऱ्यांना लेखपट्टीका सादर करण्यास दोन ते तीन महिने उशीर लावतात.

ह्या लेखपट्टिका बऱ्याच वेळा गठ्ठा केलेल्या असतात. या संबंधात ‘‘स्कीम फॉर पेमेंट ऑफ पेन्शन टु डिफेंस पेन्शनर’’ या पुस्तिकेच्या परिच्छेद ९(६), १० आणि ११ मधील संदर्भाकडे लक्ष वेधण्यात येत आहे, ज्यामध्ये प्रदाता शाखांनी, जोड शाखांनी आणि प्रतिपूर्ती करणाऱ्या शाखांनी निवृत्तीवेतन प्रदानाच्या लेखपट्टिका पारेषित करण्यासाठी कार्यपध्दती स्पष्टपणे ठरवून दिली आहे. संपूर्ण कार्यपध्दती ठरवून दिलेल्या कालमर्यादेत पूर्ण केली पाहिजे जेणेकरून प्रदान लेखपट्टिका अंतिमतः पीसीडीए (पेन्शन) अलाहाबाद यांच्या कार्यालयात उशिरात उशिरा पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत प्राप्त होतील (मार्च महिन्याच्या लेखपट्टिकांचा अपवाद, ज्या दरवर्षी उशिरात उशिरा एप्रिलच्या तिसऱ्या आठवडयात पोचल्या पाहिजेत.) पीसीडीएच्या कार्यालयानेही याची नोंद घेतली आहे कि, काही प्रकरणात उपदान आणि अंशराशीकरणाच्या रकमेचे प्रदान निवृत्तिवेतन प्रदान करणाऱ्या बँक शाखांनी विहीत तपासण्यांचे पालन न करता खोट्या आणि लबाडीच्या पीपीओज वरून तोतया व्यक्तिंना केले होते. याची सुध्दा नोंद घेण्यात आली होती कि, निवृत्तीवेतनाच्या पहिल्या प्रदानाचा वेळी, एकतर पीपीओ क्रमांक लेखपट्टिकेवर नमूद केलेले नव्हते किंवा चुकीचे पीपीओ क्रमांक नमूद केलेले होते ज्यामुळे प्रदानाची योग्यता पडताळून पाहणे कठीण झाले. त्यापुढे, ही प्रदाने मुख्य निवृत्तीवेतन प्रदान लेखपट्टिकेवर संरक्षण दलातील निवृत्तीवेतन धारकांच्या नियमित मासिक प्रदानाबरोबर दाखविली होती.

खालील बाबींची काळजी घेण्यासाठी निवृत्तीवेतन प्रदान करणाऱ्या शाखा/जोड शाखा/प्रतिपूर्ती शाखा यांना अधिक सक्षम यंत्रणा निर्माण करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. :-

(१) निवृत्तीवेतन प्रदान करणाऱ्या शाखा जोड शाखांना ठरवून दिलेल्या वेळेत (पुढच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत) निवृत्तीवेतन प्रदान लेखपट्टिका सादर करतील. लेखपट्टिकांचा गठ्ठा केला जाणार नाही.

(२) जोड शाखा लेखपट्टीकेची मूळ प्रत प्रत्येक महिन्याच्या ११ तारखेपर्यंत संक्षिप्त पत्रक आणि संक्षिप्त कागदपत्रांसह वाटप करणाऱ्या बँकाना (आरबीआय/एसबीआय वगैरे, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे) पाठवतील.

(३) प्रतिपूर्ती करणाऱ्या बँकांनी लेखपट्टिकेची मूळ प्रत, सरकारी खात्यात डेबीटद्वारे निवृत्तीवेतन प्रदान करणाऱ्या बँकेला प्रतिपूर्ती केल्यानंतर, सीडीए (निवृत्तीवेतन) ला, मार्चसाठी लेखपट्टीकेचा अपवाद वगळता, पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत पोचेल अशा प्रकारे थेट पीसीडीए (निवृत्तीवेतन) अलाहाबादकडे पाठवावी.

(४) निवृत्तीवेतनाच्या पहिल्या प्रदानाच्या प्रकरणात, निवृत्तीवेतन प्रदान करणाऱ्या शाखांनी योग्य पीपीओ क्रमांक, उपदानाची रक्कम आणि अंशराशीकरणाची रक्कम प्रत्येक निवृत्तीवेतन धारकाच्या नावासमोर दर्शवून काळजीपूर्वक लेखपट्टिका तयार करावी आणि **स्वतंत्र** संक्षिप्त पत्रकासह **स्वतंत्रपणे** तयार करणे चालूच ठेवायच्या नियमित मासिक प्रदान प्रकरणांव्यतिरिक्त मासिक तत्त्वावर **स्वतंत्र** सादर कराव्यात.

(५) निवृत्तीवेतन प्रदान करणाऱ्या शाखांनी पहिल्या निवृत्तीवेतन प्रदानाच्या त्याचप्रमाणे नियमित मासिक निवृत्तीवेतन प्रदानाच्या प्रकरणांची वेगळी संक्षिप्त पत्रके तयार करावीत.

**६. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत रेल्वे निवृत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतन प्रदान करण्याची योजना - लबाडीची प्रदाने टाळण्यासाठी पावले**

**(क्र. आरबीआय/२००५/३३४) (संदर्भ. डीजीबीए.जीएडी.क्र. एच ३३८९-३४२१/ ४५.०२.०१/२००४-०५ दिनांक जानेवारी ६, २००५)**

रेल्वे मंत्रालय, भारत सरकार (रेल्वे बोर्ड) यांनी आम्हाला असे कळविले आहे कि, त्यांच्या सतर्कता विभागाने लबाडीची प्रकरणे शोधून काढली आहेत ज्यात काही सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी निवृत्तीवेतनाचे/ निवृत्तीवेतनाची थकबाकीचे वाटप खोट्या पेन्शन पेमेंट ऑर्डर्स (पीपीओज)च्या समक्ष अनाधिकृत व्यक्तिंना केले आहे. त्यांनी असेहि निरीक्षण केले आहे कि, अशी लबाडीची प्रदाने निवृत्तीवेतन प्रदान करणाऱ्या बँकांनी विहीत तपासण्यांचे पालन न करता म्हणजेच अधिकृत स्वाक्षरीकर्त्याने सही न केलेल्या हिशोब पत्रकाच्या आधारे, त्याचप्रमाणे ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीची, विशेषतः बँकानी पीपीओज स्वीकारण्याच्या बाबतीत, पूर्तता न करता प्रदाने मुक्त केली आहेत.

रेल्वे निवृत्तीवेतन प्रदान करणाऱ्या शाखांना विनंती करण्यात येते कि, त्यानी खोट्या प्रदान आदेशांच्या समक्ष लबाडीची प्रदाने टाळण्यासाठी रेल्वे निवृत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतनाच्या वाटपासाठी रेल्वे मंत्रालयाने (रेल्वे बोर्ड) 'स्कीम फॉर पेमेंट ऑफ रेल्वे पेन्शन थ्रु पब्लिक सेक्टर बँकस' मध्ये ठरवून घालून दिलेल्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करावे.

**७. केंद्रीय नागरी निवृत्तीवेतनाचे प्रदान - निवृत्तीवेतन प्रदानाच्या आदेशांच्या (पीपीओज) दोन्ही अर्धात महागाई भत्त्याची नोंद**

**(डीजीबीए.जीएडी.क्र. एच-३४५२-३४८५/४५.०१.००१/२००४-०५ दिनांक जानेवारी ११, २००५)**

आमच्या असे नजरेला आले आहे कि, काही निवृत्तीवेतन प्रदान करणाऱ्या शाखा जेव्हा केव्हा संबंधित निवृत्तीवेतन प्रदान आदेशांच्या (पीपीओ) **दोन्ही अर्धात** मूलभूत दरात बदल होतो तेव्हा मूलभूत निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन यांची रक्कम अद्यतन करीत नाहीत.

या संबंधात आम्ही येथे खाली 'स्कीम फॉर पेंशन्स टु सेंट्रल गव्हर्नमेंट सिव्हिल पेन्शनर्स बाय पब्लिक सेक्टर बँकस' च्या परिच्छेद १२.१७ आणि १९.१ चे पुनरुत्पादन करीत आहोत.

> "जेव्हा केव्हा निवृत्तीवेतनाच्या मूलभूत दरात आणि/किंवा निवृत्तीवेतनावरील महागाई भत्त्यात बदल होतो, प्रदान करणाऱ्या शाखेने निवृत्तीवतन धारकाचा निवृत्तीवेतन आदेश परत मागवून घ्यावा आणि त्यावर इतर बाबींबरोबरच बदल ज्या तारखेपासून प्रभावी आहेत ते दर्शवून बदलांची नोंद करावी. असे केल्यानंतर ते अर्धभाग निवृत्तीवेतन धारकाला परत द्यावेत." (परिच्छेद १२.१७).
>
> जेव्हा केव्हा सरकार निवृत्तीवेतनावर कोणताहि अतिरिक्त फायदा मंजुर करते, त्या अर्थाची सूचना प्रत्येक नामनिर्देशित सार्वजनिक क्षेत्रातील बँकेच्या अधिकृत प्रतिनिधीला (त्याच्या नावे) बँकेने दिलेल्या पत्त्यावर कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तीवेतन मंत्रालय (निवृत्तीवेतन आणि निवृत्तीवेतन धारक कल्याण विभाग़) यांच्या तर्फे पाठविली जाते. त्यानंतर कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तीवेतन मंत्रालय (निवृत्तीवेतन आणि निवृत्तीवेतन धारक कल्याण विभाग़) यांच्याकडून दिल्ली किंवा अन्यत्र प्रचालन करणाऱ्या त्यांच्या प्रतिनिधीमार्फत, आवश्यक त्या संख्येतील मंजूरीच्या प्रती (आगाऊ कळवायच्या) त्यासंबंधातील रेडीरेकनरसहित प्राप्त करणे आणि प्रदाता शाखांनी तातडीने अंमलबजावणी करण्याकरिता दहा दिवसांच्या आत त्यांच्याकडे पारेषित करण्यासाठी त्वरित त्यांच्या संबंधित मुख्य कार्यालयाकडे पाठविणे ही बँकांची जबाबदारी असेल. प्रत्येक प्रदाता बँक तत्परतेने त्यांच्या प्रदानाधीन केंद्रीय नागरी निवृत्तीवेतन धारकाना देय असलेल्या निवृत्तीवेतनावरील सुधारित रिलिफ दर निश्चित करील. प्रत्येक निवृत्तीवेतन धारकाला लागू असणाऱ्या या दरांचा हिशोब परिशिष्ट २२ (पान ४१ ) नुसार केला जाईल **आणि या खाती निवृत्तीवेतन धारकाला, सुधारित दराने रिलिफचे आणि/किंवा थकबाकीचे प्रदान काही असल्यास, सुरू करण्यापूर्वी शाखा व्यवस्थापकाच्या /प्रभारीच्या साक्षांकनाधीन वाटपकर्त्याच्या पीपीओच्या भागावर ज्या तारखेपासून रिलिफ प्रभावी होईल** त्या तारखेसह त्याची नोंद केली जाईल..........." (परिच्छेद १९.१).

बँकांना अशी विनंती करण्यात येत आहे कि, त्यांनी निवृत्तीवेतन प्रदाता शाखांचे लक्ष उक्त तरतूदींकडे वेधावे आणि सूचनांचे कठोरपणे पालन करण्याचा सल्ला द्यावा.

**८. एजन्सी बँकांद्वारे रेल्वे निवृत्तीवेतन धारकांना वाटप - बँका अधिक प्रदान करण्याची शक्यता असलेली मुख्य क्षेत्रे**

**(डीजीबीए.जीएडी.क्र. ६०७३/४५.०५.०३१/२००४-०५ दिनांक मे ३०, २००५)**

आर्थिक सल्लागार आणि मुख्य लेखा अधिकाऱ्यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेली रेल्वे निवृत्तीवेतन धारकांच्या बाबतीत बँका अधिक प्रदान करण्याची शक्यता असलेल्या मुख्य क्षेत्रांची सूची, सर्व एजन्सी बँकांना, ती त्यांच्या निवृत्तीवेतन प्रदाता शाखांमध्ये वितरित करण्याची आणि रेल्वे निवृत्तीवेतनाचे अधिक प्रदान करणे टाळण्यासाठी उचित कारवाई करण्याची सूचना देण्याच्या विनंतीसह पाठविण्यात आली होती.

**९. पेन्शनची थकबाकी प्रदान करण्यासाठी, रेल्वेच्या पेन्शनरांबाबत नामनिर्देशन ( फॉर्म अ व ब ) फॉर्म्सचा स्वीकार**

**( संदर्भ -डीजीबीए. जीएडी. क्र. एच-३६११/४५.०३.००२/२००५-०६ दि. ऑक्टोबर. १०, २००५ )**

पेन्शनरांना असुविधा होऊ नये ह्यासाठी, रेल्वे मंत्रालयाने, ( रेल्वे मंडळ ) केंद्रीय पेन्शन लेखा कार्यालय (सीपीएओ) द्वारा विहित केलेले नामनिर्देशन फॉर्म्स ( अ व ब ) रेल्वेच्या पेन्शनरांसाठीही स्वीकण्याचे ठेविले आहे. रेल्वे पेन्शनरांनी सादर केलेले फॉर्म अ किंवा ब, त्यांच्या पेन्शनींची थकबाकी त्यांच्या वारसांना अदान करण्यासाठी, पेन्शन अदा करणाऱ्या शाखांना, एजन्सी बँकांनी आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

**१०. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत रेल्वे निवृत्तीवेतन धारकाना निवृत्तीवेतन प्रदान करण्याची योजना- रेल्वे मंत्रालयातर्फे सात नवीन खंडांच्या एफएज आणि सीएओजची नियुक्ती.**

**(डीजीबीए.जीएडी.क्र.एच. १०७४६/४५.०३.००१/२००५-०६ दिनांक जानेवारी २४, २००६)**

रेल्वे मंत्रालयाने एप्रिल १, २००६ पासून प्रभावाने रेल्वे निवृत्तीवेतन धारकाना अधिकृत बँकांद्वारे निवृत्तीवेतन प्रदानाच्या संबंधात निवृत्तीवेतन डेबीटच्या तडजोडीसाठी/स्वीकृतीसाठी सात नवीन खंडांच्या एफएज आणि सीएओजची नियुक्ती करण्याचे ठरविले आहे (ती अशी : उत्तर पश्चिम रेल्वे : जयपूर, पूर्व मध्य रेल्वे : हाजीपूर, पूर्व किनारा रेल्वे : भुवनेश्वर , उत्तर मध्य रेल्वे : अलाहाबाद, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे : बिलासपूर, दक्षिण पश्चिम रेल्वे : हुबळी आणि पश्चिम मध्य रेल्वे : जबलपूर).

**११.सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या मार्फत पेन्शन वाटप – डिअरनेस रिलीफ (डीआर) चे प्रदान**
**(संदर्भ - डीजीबीए.जीएडी.क्र.एच.११३०३/४५.०१.००३/२००५-०६दि. फेब्रु. ६, २००६ )**

पेन्शन प्रदान करणाऱ्या बँकांना सांगण्यात आले होते की त्यांनी, सरकारी आदेशांच्या प्रती ताबडतोब प्राप्त करण्यासाठी योग्य ती यंत्रणा कार्यान्वित शाखांना द्याव्यात. त्यामुळे सरकारने जाहीर केलेले लाभ पेन्शनरांना त्यापुढील महिन्याच्या पेन्शनमध्येच मिळतील. एजन्सी बँकांच्या नियंत्रक/मुख्य कार्यालयांनी, पात्र असलेल्या पेन्शनरांना सरकारी पेन्शनचे वाटप योग्य प्रकारे होत आहे ह्यावर देखरेख करावी. ह्याशिवाय, केंद्रीय नागरी व रेल्वे पेन्शनर्सच्या बाबतीत, पेन्शन देणाऱ्या बँकांनी, नामनिर्देशन फार्म अ व ब अनुसार, पासबुकांच्या प्रथम पानावर नामनिर्देशितांची नांवे प्रदर्शित करावीत आणि त्या शाखांना सांगण्यात यावे की, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी, पेन्शनरांना पेन्शन देण्याबाबतच्या ह्या योजनेमधील कार्यरीतींचे पालन केले गेले असल्याची त्यांनी खात्री करुन घ्यावी. पेन्शन योजना/नियम ह्याबाबत कर्मचाऱ्यांना अधिक चांगली जाणीव व्हावी ह्यासाठी, बँकांनी त्यांच्या प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षण कार्यक्रमाचा एक महत्वाचा भाग म्हणून ह्याचा समावेश करावा.

**१२. अधिकृत बँकांद्वारे निवृत्तीवेतनाचे प्रदान- निवृत्तीवेतन धारकाने त्याच्या/तिच्या जोडीदारासमवेत प्रचालन केलेल्या संयुक्त खात्यात निवृत्तीवेतन जमा करणे.**

**(डीजीबीए.जीएडी.क्र. १२७३६/४५.०३.००१/२००५-०६ दिनांक फेब्रुवारी २४, २००६)**

केंद्रीय नागरी निवृत्तीवेतन धारकांच्या संबंधातील निवृत्तीवेतन प्रदान आदेशात (पीपीओ) कुटूंब निवृत्तीवेतनासाठी ज्या जोडीदाराच्या नावे अधिकार विद्यमान आहे त्याच्यासमवेतच्या संयुक्त खात्यात निवृत्तीवेतनाची रक्कम जमा करण्याच्या बाबतीतील सेंट्रल पेन्शन अकाउंटिंग ऑफिस (सीपीएओ) ने निर्गमित

केलेल्या सूचना, रेल्वे मंत्रालयाच्या (रेल्वे बोर्ड) परिपत्रक क्र. आरबीए ६३/२००५(२००५/एसीर/२१/१९) दिनांक ऑक्टोबर १३, २००५ अन्वये रेल्वे निवृत्तीवेतन धाराकानाहि लागू करण्यात आल्या आहेत. जोडीदारासमवेतच्या संयुक्त खात्याचे रेल्वे मंत्रालयाच्या दिनांक ऑक्टोबर १३, २००५ च्या उक्त संदर्भित परिपत्रकाच्या अटी आणि शर्तींच्या अधीन, ‘‘आधीचा किंवा मागे राहणारा’ किंवा ‘कोणीहि एक किंवा मागे राहणारा’ प्रचालन करू शकतो.

**१३. अधिकृत बँकांद्वारे निवृत्तीवेतनाचे प्रदान- निवृत्तीवेतनधारकाने त्याच्या जोडीदारासमवेत प्रचालन केलेल्या संयुक्त बँक खात्यात निवृत्तीवेतन जमा करणे.**

**(संदर्भ. डीजीबीए.जीएडी.क्र. एच-२१३४/४५.०२.००१/२००६-०७ दिनांक ऑगस्ट ४, २००६)**

संरक्षण मंत्रालय आणि संरक्षण लेखाचे मुख्य नियंत्रक यांनी पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ) मध्ये कुटुंब निवृत्तीवेतनासाठी ज्या जोडीदाराच्या नावे अधिकार आहे त्याच्या / तिच्यासह प्रचालन केलेल्या संयुक्त खात्यातसुद्धा निवृत्तीवेतन जमा करण्यास परवानगी देणारा बदल निवृत्तीवेतन प्रदान योजनेत केला आहे. जोडीदारासमवेतचे संयुक्त खाते खालील अटी आणि शर्तींच्या अधीन, ‘‘आधीचा किंवा मागे राहणारा’ किंवा ‘कोणीहि एक किंवा मागे राहणारा’ प्रचालन करू शकतो. :-

(अ) एकदा निवृत्तीवेतन, निवृत्तीवेतन धारकाच्या बँक खात्यात जमा केले कि सरकार/बँकेची जबाबदारी संपेल. यदाकदाचित जोडीदाराने चुकीच्या पद्धतीने रक्कम काढून घेतली तरीही पुढील जबाबदारी उद्‌भवत नाही.

(ब) निवृत्तीवेतन, निवृत्तीवेतनधारक जीवंत असेपर्यंत देय आहे, तिचा/त्याचा मृत्यू झाल्यास बँकेला लवकरात लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत मृत्यूपासून एका महिन्याच्या आत कळवले पाहिजे, जेणेकरून बँक निवृत्तीवेतन धारकाच्या मृत्यूनंतर जोडीदारा - समवेतच्या संयुक्त खात्यात निवृत्तीवेतन जमा करणे बँक चालू ठेवणार नाही. पण, यदाकदाचित कोणतीही रक्कम चुकून जर संयुक्त खात्यात जमा करण्यात आली असेल तर, ती निवृत्तीवेतन धारकाने/जोडीदाराने तिच्या/त्याच्या समवेत किंवा स्वतंत्रपणे धारण केलेल्या खात्यातून वसूलीयोग्य असेल. संयुक्त खात्यात जमा केलेली कोणतीही रक्कम परत करण्यास कायदेशीर वारस, वारसदार, कार्यवाहक वगैरेसुद्धा जबाबदार असतील.

(क) निवृत्तीवेतनाच्या थकबाकीच्या प्रदानाचा (नामनिर्देशन) नियम १९८३ निवृत्ती वेतनधारकाच्या जोडीदारासमवेतच्या संयुक्त खात्याला लागू होणे चालूच राहील. ह्याचा अर्थ असा कि जर तेथे ह्या नियमांच्या नियम ५ आणि ६ नुसार ‘स्वीकृत नामनिर्देशिती’ असेल तर नियमात नमूद केलेली निवृत्तीवेतनाची थकबाकी नामनिर्देशितीला देय असेल.

उक्त दर्शवल्याप्रमाणे त्यांचे निवृत्तीवेतन संयुक्त खात्यात जमा करू इच्छिणाऱ्या विद्यमान निवृत्तीवेतन धारकांनी, ज्या बँकेतून त्यांना सध्या निवृत्तीवेतन मिळत आहे त्या बँकेला विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्यावर जोडीदारानेसुध्दा ह्या कार्यालयीन ज्ञापनात ठरवून दिलेल्या अटी आणि शर्तींचा स्वीकार केल्याचे प्रतिक म्हणून सही केली पाहिजे. ह्या सूचना, ह्या ज्ञापनाच्या निर्गमनानंतर निवृत्त होणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांनासुद्धा लागू असतील.

**१४. पश्चिम बंगालच्या (भाग-ए) सरकारी निवृत्तीवेतनधारकाना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे निवृत्तीवेतन प्रदानाची योजना- निवृत्तीवेतनधारकाने त्याच्या/तिच्या जोडीदारासमवेत प्रचालन केलेल्या संयुक्त बँक खात्यात निवृत्तीवेतन जमा करणे.**

**(संदर्भ. डीजीबीए.जीएडी.६९२६/४५.०५.००५/२००६-०७ दिनांक ऑक्टोबर ३०, २००६)**

पश्चिम बंगाल सरकारने पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ) मध्ये कुटुंब निवृत्तीवेतनासाठी ज्या जोडीदाराच्या नावे अधिकार आहे त्याच्या/तिच्यासह प्रचालन केलेल्या संयुक्त खात्यातसुद्धा निवृत्तीवेतन जमा करण्यास परवानगी देणारा बदल निवृत्तीवेतन प्रदान योजनेत केला आहे. जोडीदारासमवेतचे संयुक्त खाते खालील अटी आणि शर्तींच्या अधीन, “आधीचा किंवा मागे राहणारा’ किंवा ‘कोणीहि एक किंवा मागे राहणारा’ प्रचालन करू शकतो. :-

(अ) एकदा निवृत्तीवेतन, निवृत्तीवेतन धारकाच्या बँक खात्यात जमा केले कि सरकार/बँकेची जबाबदारी संपेल. यदाकदाचित जोडीदाराने चुकीच्या पद्धतीने रक्कम काढून घेतली तरीही पुढील जबाबदारी उद्भवत नाही.

(ब) निवृत्तीवेतन, निवृत्तीवेतनधारक जीवंत असेपर्यंत देय आहे, तिचा/त्याचा मृत्यू झाल्यास बँकेला लवकरात लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत मृत्यूपासून एका महिन्याच्या आत कळवले पाहिजे, जेणेकरून बँक निवृत्तीवेतन धारकाच्या मृत्यूनंतर जोडीदारासमवेतच्या संयुक्त खात्यात निवृत्तीवेतन जमा करणे बँक चालू ठेवणार नाही. पण, यदाकदाचित कोणतीही रक्कम चुकून जर संयुक्त खात्यात जमा करण्यात आली असेल तर, ती निवृत्तीवेतन धारकाने/जोडीदाराने तिच्या/त्याच्या समवेत किंवा स्वतंत्रपणे धारण केलेल्या खात्यातून वसूलीयोग्य असेल. संयुक्त खात्यात जमाकेलेली कोणतीही रक्कम परत करण्यास कायदेशीर वारस, वारसदार, कार्यवाहक वगैरेसुद्धा जबाबदार असतील.

(क) निवृत्तीवेतन थकबाकीचे प्रदान (नामनिर्देशिती) नियम १९८३ वेतनधारकाच्या जोडीदारासमवेतच्या संयुक्त खात्याला लागू होणे चालूच राहील. ह्याचा अर्थ असा कि जर तेथे ह्या नियमांच्या नियम ५ आणि ६ नुसार ‘स्वीकृत नामनिर्देशिती’ असेल तर नियमात नमूद केलेली निवृत्तीवेतनाची थकबाकी नामनिर्देशितीला देय असेल.

उक्त दर्शवल्याप्रमाणे त्यांचे निवृत्तीवेतन संयुक्त खात्यात जमा करू इच्छिणाऱ्या विद्यमान निवृत्तीवेतन धारकानी, ज्या बँकेतून त्यांना सध्या निवृत्तीवेतन मिळत आहे त्या बँकेला विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्यावर जोडीदारानेसुध्दा ह्या कार्यालयीन ज्ञापनात ठरवून दिलेल्या अटी आणि शर्तीचा स्वीकार केल्याचे प्रतिक म्हणून सही केली पाहिजे. ह्या सूचना, ह्या ज्ञापनाच्या निर्गमनानंतर निवृत्त होणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांनासुद्धा लागू असतील.

## १५. पंजाबच्या सरकारी निवृत्तीवेतनधारकाना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे निवृत्तीवेतन प्रदानाची योजना.

**(संदर्भ.डीजीबीए.जीएडी.एच-८९७३/४५.०५.००३/२००६-०७ दिनांक नोव्हेंबर २४, २००६)**

पंजाब सरकारने पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ) मध्ये कुटुंब निवृत्तीवेतनासाठी ज्या जोडीदाराच्या नावे अधिकार आहे त्याच्या/तिच्यासह पंजाब सरकारच्या निवृत्तीवेतन धारकाने प्रचालन केलेल्या संयुक्त खात्यातसुद्धा निवृत्तीवेतन जमा करण्यास परवानगी देणारा बदल निवृत्तीवेतन योजनेत केला आहे. जोडीदारासमवेतचे संयुक्त खाते खालील अटी आणि शर्तींच्या अधीन, “आधीचा किंवा मागे राहणारा’ किंवा ‘कोणीहि एक किंवा मागे राहणारा’ प्रचालन करू शकतो. :-

(अ) एकदा निवृत्तीवेतन, निवृत्तीवेतन धारकाच्या बँक खात्यात जमा केले कि सरकार/बँकेची जबाबदारी संपेल. यदाकदाचित जोडीदाराने चुकीच्या पद्धतीने रक्कम काढून घेतली

तरीही पुढील जबाबदारी उद्भवत नाही.

(ब) निवृत्तीवेतन, निवृत्तीधारक जीवंत असेपर्यंत देय आहे, तिचा/त्याचा मृत्यू झाल्यास बँकेला लवकरात लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत मृत्यूपासून एका महिन्याच्या आत कळवले पाहिजे, जेणेकरून बँक निवृत्तीवेतन धारकाच्या मृत्यूनंतर जोडीदारा-समवेतच्या संयुक्त खात्यात निवृत्तीवेतन जमा करणे बँक चालू ठेवणार नाही. पण, यदाकदाचित कोणतीही रक्कम चुकून जर संयुक्त खात्यात जमा करण्यात आली असेल तर, ती निवृत्तीवेतन धारकाने/जोडीदाराने तिच्या/त्याच्या समवेत किंवा स्वतंत्रपणे धारण केलेल्या खात्यातून वसूलीयोग्य असेल. संयुक्त खात्यात जमा केलेली कोणतीही रक्कम परत करण्यास कायदेशीर वारस, वारसदार, कार्यवाहक वगैरेसुद्धा जबाबदार असतील.

(क) निवृत्तीवेतनाच्या थकबाकीच्या प्रदानासाठी नामनिर्देशनाची तरतूद पंजाब फाइनॅन्शियल नियम व्हॉल्युम.१ च्या नियम ५.३ अधीन टीप ४ आणि ह्या विषयावर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांनुसार जोडीदारासमवेतच्या संयुक्त खात्याला लागू होणे चालूच राहील. ह्याचा अर्थ असा कि जर तेथे ह्या नियमांनुसार 'स्वीकृत नामनिर्देशिती' असेल तर नियमात नमूद केलेली निवृत्तीवेतनाची थकबाकी नामनिर्देशितीला देय असेल. सुधारित नामनिर्देशन प्रपत्रे वित्त विभाग, पंजाब यांच्या परिपत्रक पत्र क्र. २१(१)८३-एफआर(६) ११९९१ दिनांक २० नोव्हेंबर १९८४ अन्वये दुरुस्त आली आहेत.

उक्त दर्शवल्याप्रमाणे त्यांचे निवृत्तीवेतन संयुक्त खात्यात जमा करू इच्छिणाऱ्या विद्यमान निवृत्तीवेतन धारकानी, ज्या बँकेतून त्यांना सध्या निवृत्तीवेतन मिळत आहे त्या बँकेला विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्यावर जोडीदारानेसुध्दा ह्या कार्यालयीन ज्ञापनात ठरवून दिलेल्या अटी आणि शर्तींचा स्वीकार केल्याचे प्रतिक म्हणून सही केली पाहिजे. ह्या सूचना, ह्या ज्ञापनाच्या निर्गमनानंतर निवृत्त होणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांनासुद्धा लागू असतील.

**१६. केंद्र सरकारच्या निवृत्तीवेतनाचे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे वाटप - निवृत्तीवेतनाच्या स्लीप देणे.**

**(संदर्भ. डीजीबीए.जीडीए.एच.१०९७५/४५.०५.०३१/२००६-०७ दिनांक जानेवारी ९, २००७)**

केंद्रीय निवृत्तीवेतन लेखा कार्यालय, वित्त मंत्रालय, आणि भारत सरकार यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर केंद्र सरकारच्या निवृत्तीवेतन धारकांना (नागरी) निवृत्तीवेतन सुरू झाल्यावर आणि त्यानंतर जेव्हा केव्हा निवृत्तीवेतनाच्या राशीत बदल होईल तेव्हा निवृत्तीवेतन स्लीप देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व एजन्सी बँकांना त्यांच्या निवृत्तीवेतनाचे प्रदान करणाऱ्या शाखांना त्यानुसार सूचना देण्यासाठी कळवण्यात आले आहे.

**१७. संरक्षण दलातील निवृत्तीवेतनाच्या प्रतिपूर्तीसाठी एक खिडकी पद्धतीची सुरवात**

**(संदर्भ. डीजीबीए.जीएडी.क्र. एच-१३८३४/४५.०२.००१/२००६-०७ दिनांक मार्च १३, २००७)**

संरक्षण लेखाचे (निवृत्तीवेतन) मुख्य नियंत्रक यांच्या कार्यालयाशी सल्लामसलत करून एप्रिल १, २००७ पासून प्रभावाने संरक्षण दलातील निवृत्तीवेतनाच्या प्रदानाच्या प्रतिपूर्तीसाठी एक खिडकी पध्दत सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रतिपूर्ती करणाऱ्या बँका म्हणजेच आरबीआय आणि सहयोगी बँका एप्रिल १, २००७ पासून बँकानी संरक्षण दल निवृत्तीवेतन प्रदानाची प्रतिपूर्ती करणे बंद करतील. निवृत्तीप्रदानाचे व्यवहार केंद्रीय नागरी निवृत्तीवेतनाच्या बाबतीत असल्याप्रमाणे नागपूर येथील जोडकक्षामार्फत निधीच्या तडजोडीसाठी केंद्रीय लेखा विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, नागपूर यांना कळविण्यात येतील. एजन्सी

बँकानी प्रदान लेखपट्टिका थेट श्री. बी.डी. तिवारी, एसएओ(पी), पीसीडीए (पी) यांचे कार्यालय, द्रौपदी घाट, अलाहाबाद यांच्या नावे पाठवणे आवश्यक आहे.

एप्रिल १, २००७ पूर्वीचे असलेले सर्व व्यवहार, ज्यासाठी निवृत्तीवेतन लेखपट्टिका अपेक्षित आहेत त्यांचा प्रश्न आरबीआय/एसबीआय आणि त्यांच्या सहयोगी बँकांच्या प्रतिपूर्ती करणाऱ्या बँकांद्वारे सोडविण्यात येईल.

**१८. अरुणाचल प्रदेशच्या सरकारी निवृत्तीवेतनधारकाना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे निवृत्तीवेतन प्रदानाची योजना.**

**(संदर्भ. डीजीबीए.जीएडी.१४२७९/४५.०५.०२४/२००६-०७ दिनांक मार्च २३, २००७)**

अरुणाचल प्रदेश सरकारने पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ) मध्ये कुटुंब निवृत्तीवेतनासाठी ज्या जोडीदाराच्या नावे अधिकार आहे त्याच्या/तिच्यासह पंजाब सरकारच्या निवृत्तीवेतन धारकाने प्रचालन केलेल्या संयुक्त खात्यातसुद्धा निवृत्तीवेतन जमा करण्यास परवानगी देणारा बदल निवृत्तीवेतन योजनेत केला आहे. जोडीदारासमवेतचे संयुक्त खाते खालील अटी आणि शर्तींच्या अधीन, ''आधीचा किंवा मागे राहणारा' किंवा 'कोणीहि एक किंवा मागे राहणारा' प्रचालन करू शकतो. :-

(अ) एकदा निवृत्तीवेतन, निवृत्तीवेतन धारकाच्या बँक खात्यात जमा केले कि सरकार/ बँकेची जबाबदारी संपेल. यदाकदाचित जोडीदाराने निवृत्तीवेतनधारकाला माहिती नसताना चुकीच्या पद्धतीने रक्कम काढून घेतली तरीही पुढील जबाबदारी उद्‌भवत नाही.

(ब) निवृत्तीवेतन, निवृत्तीधारक जीवंत असेपर्यंत देय आहे, तिचा/त्याचा मृत्यू झाल्यास बँकेला लवकरात लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत मृत्यूपासून एका महिन्याच्या आत कळवले पाहिजे, जेणेकरून बँक निवृत्तीवेतन धारकाच्या मृत्यूनंतर जोडीदारासमवेतच्या संयुक्त खात्यात निवृत्तीवेतन जमा करणे बँक चालू ठेवणार नाही. पण, यदाकदाचित कोणतीही रक्कम चुकून जर संयुक्त खात्यात जमा करण्यात आली असेल तर, ती निवृत्तीवेतन धारकाने/जोडीदाराने तिच्या/त्याच्या समवेत संयुक्तपणे धारण केलेल्या किंवा तिच्या/त्याच्या स्वतंत्र खात्यातून वसूलीयोग्य असेल. संयुक्त खात्यात जमा केलेली कोणतीही रक्कम परत करण्यास कायदेशीर वारस, वारसदार, कार्यवाहक वगैरेसुद्धा जबाबदार असतील.

क) उक्त दर्शवल्याप्रमाणे त्यांचे निवृत्तीवेतन संयुक्त खात्यात जमा करू इच्छिणाऱ्या विद्यमान निवृत्तीवेतन धारकानी, ज्या बँक शाखेतून त्यांना सध्या निवृत्तीवेतन मिळत आहे त्या बँकेला विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्यावर निवृत्तीवेतन धारकाच्या जोडीदारानेसुध्दा अटींचा स्वीकार केल्याचे प्रतिक म्हणून सही केली पाहिजे. ह्या सूचना, ह्या ज्ञापनाच्या निर्गमनानंतर निवृत्त होणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यानासुद्धा लागू असतील.

ड) निवृत्तीवेतन जमा करण्यासाठी पीपीओ मध्ये ज्याच्या नावे अधिकार दिलेला आहे त्या जोडीदाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तिसमवेत संयुक्त खाते उघडणे अनुज्ञेय नसेल. ह्या सुधारित योजनेत कुटुंब निवृत्तीवेतन धारकांचा समावेश नाही.

**१९. केंद्र सरकारच्या निवृत्तीवेतनाचे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे वाटप - संरक्षण दलातील निवत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतनाच्या स्लीप देणे.**

**(संदर्भ. डीजीबीए.जीडीए.एच-१७६६३/४५.०५.०३१/२००६-०७ दिनांक जून १२, २००७)**

संरक्षण लेखाच्या मुख्य नियंत्रकांचे कार्यालय आणि माजी-सैनिक कल्याण विभाग, संरक्षण मंत्रालय यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर कुटुंब निवृत्तीवेतन धारकांसह संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांना/संरक्षण दलातील नागरी निवृत्तीवेतन धारकांना केंद्र सरकारच्या नागरी निवृत्तीवेतन धारकांना लागू असल्याप्रमाणे निवृत्तीवेतन स्लीप देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व एजन्सी बँकांना त्यांच्या निवृत्तीवेतनाचे प्रदान करणाऱ्या शाखांना त्यानुसार सूचना देण्यासाठी कळवण्यात आले आहे.

**२०. केंद्र सरकारच्या निवृत्तीवेतनाचे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधून वाटप - रेल्वेच्या निवृत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतन स्लिप देणे.**

**(संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र. ३८५६/४५.०५.०३१/२००७-०८ दिनांक ऑक्टोबर ८, २००७)**

रेल्वे मंत्रालय, रेल्वे मंडळाने, रेल्वे निवृत्तीवेतन धारकांना/फॅमिली पेन्शनर्सना केंद्र सरकारच्या (नागर) निवृत्तीवेतन धारकांना धारकांना लागु असलेल्या सध्या अस्तित्वात असलेल्या प्रणालीनुसारच पेन्शन स्लिप्स द्यावयाचे ठरविले आहे. त्यानुसार, रेल्वे पेन्शनरांना/फॅमिली पेन्शनरांना विहित नमुन्यामध्ये, पेन्शन सुरु झाल्यावर व नंतर पेन्शनच्या रकमेत बदल झाल्यावर पेन्शन स्लिप्स दिल्या जातील. सर्व प्रतिनिधी बँकांना त्यांच्या पेन्शन देणाऱ्या शाखांना योग्य त्या सूचना देण्याबाबत कळविण्यात आले होते.

**२१. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे आसाम सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्यासाठी योजना - एखाद्या पेन्शनराच्या पति/पत्नी सह चालविलेल्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे.**

**(संदर्भ. डीजीबीए.जीएडी. क्र. ७५७०/४५.०५.०१८/ २००७-०८ दिनांक जानेवारी १५, २००८ व आसाम सरकारचा मेमोरँडम क्र. पीपीजी (पी) ९२/२००६/१८ दिनांक डिसेंबर १२, २००७ सह.)**

आसाम सरकारने पेन्शन देण्याच्या योजनेमध्ये बदल केला असून, पेन्शन पे ऑर्डर मध्ये (पीपीओ) ज्या व्यक्तीच्या नावे फॅमिली पेन्शन प्राधिकृत केले गेले आहे अशा पती/पत्नी ह्यांनी संयुक्तपणे चालविलेल्या बचत/करंट खात्यातही ते निवृत्ती वेतन आता जमा केले जाऊ शकते. पेन्शनर व्यक्तीचे संयुक्त खाते, पुढील अटी व शर्तींवर ''पूर्वीचा अथवा जीवित'' किंवा ''दोन्ही पैकी एक अथवा जीवित'' ह्या धर्तीवर चालविता येईल. : -

(अ) पेन्शनरच्या बँक खात्यात पेन्शन जमा झाले की सरकारची/बँकेची जबाबदारी संपते. पती किंवा पत्नीने चुकून पैसे काढल्यास पुढील जबाबदारी बँक/सरकार ह्यांची नसेल.

(ब) पेन्शनर व्यक्तीच्या हयातीतच पेन्शन दिले जात असल्याने, त्याचा/तिचा मृत्यु झाल्यास त्याबाबत त्या मृत्युच्या एक महिन्याच्या आत बँकेला कळविले जावे, म्हणजे त्यानंतर अशावेळी पती/पत्नीच्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करण्याचे बँकेला कारण नाही. तथापि अशा खात्यात चुकून पेन्शन जमा केले गेल्यास, ते पैसे त्या खात्यातून आणि किंवा तो पेन्शनर/त्याची पती/पत्नी ह्यांच्या संयुक्त/व्यक्तिशः ठेवलेल्या खात्यातून वसूल केले जातील. ह्या संयुक्त खात्यात चुकून जमा झालेले निवृत्तीवेतन, त्या मृत पेन्शनराचे कायदेशीर वारस, वारस, एक्झिक्युटर्स ह्यांच्याकडूनही वसूल केले जाईल.

(क) मृत पेन्शनराच्या (पती/पत्नी) बरोबर असलेल्या संयुक्त खात्यालाही दि आसाम पेमेंट ऑफ अरिअर्स (नॉमिनेशन) रुल्स १९८७ लागु होतील. ह्याचा अर्थ म्हणजे, ह्या नियमावलीतील नियम ५ व ६ अनुसार ''नामनिर्देशनाचा स्वीकार'' झाला असल्यास ह्या नियमात निर्देश केलेली पेन्शनची थकबाकी नामनिर्देशकाला देय असेल.

सध्याच्या पेन्शनरांना त्यांचे पेन्शन वर निर्देश केल्याप्रमाणे संयुक्त खात्यात जमा करावयाची इच्छा असल्यास त्यांनी, ते ज्या शाखेतून पेन्शन घेतात त्या बँक-शाखेमध्ये विहित फॉर्ममध्ये अर्ज करावा. ह्या अर्जावर पेन्शनराच्या पती/पत्नीनेही ह्या ऑफिस मेमोरँडममधील अटी व शर्ती मान्य केल्याचे दर्शविण्यासाठी सही

करावी. आसाम सरकारचा ऑफिस मेमोरँडम पीपीजी (पी) ९२/२००६/१८ दि. डिसेंबर १२, २००७ प्रसृत झाल्यानंतर सेवानिवृत होणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांनाही वरील निदेश लागु आहेत.

**२२. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे पुदुचेरी सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याच्या योजनेत सुधारणा**

**(संदर्भ. डीजीबीए.जीएडी. ९०३६/४५.०५.०१७/ २००७-०८ दिनांक फेब्रुवारी १९, २००८)**

१७-१२-२००७, पासून पुदुचेरीच्या केंद्र शासित प्रदेशासाठी वेगळे सार्वजनिक खाते तयार केले असल्याकारणाने, पुदुचेरी सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत पेन्शन देण्याच्या योजनेत, राजपत्रित सरकारी आदेश एमएस.क्र. ७/२००८/एफआय (बी) दि. जानेवारी ८, २००८. अनुसार काही बदल केले आहेत. ह्या योजनेसाठी पाँडिचरीच्या केंद्र शासित प्रदेशामधील स्वातंत्र्य सैनिकांचाही पेन्शनरांमध्येच समावेश करण्यात आला आहे. ह्या सुधारित योजनेनुसार सर्व प्रतिनिधी बँकांना योग्य ती कारवाई करण्यास सांगण्यात आले आहे.

| अनु. क्र. | परिच्छेद क्र. | च्या ऐवजी | वाचण्यात यावे |
|---|---|---|---|
| १ | २अ(३) | लिंक ब्रँचेस म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील बँकेचा व्यवहार करणारी पुदुचेरी करणारी बँकही असू शकते. | लिंक ब्रँच म्हणजे, चेन्नई येथे असलेली, सार्वजनिक क्षेत्रातील बँकेची शाखा |
| २ | १०.७ | प्रदानकर्ता व लिंक ब्रँच एकच असल्याचे सोडता, जोडपत्र - ४ मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये, प्रदानकर्ता शाखेकडून, चार प्रतींमध्ये स्क्रोल्स तयार केले जातील. तथापि वरील प्रमाणे एकच शाखा असल्यास तीन प्रति केल्या जातील प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत प्रदानकर्ता शाखा तिच्या लिंक ब्रँचकडे पेन्शन पेमेंट्सची सूचना पाठवतील व त्या सूचनेवरच प्रदानाचे प्रमाणपत्र असेल. प्रदानकर्ता शाखेकडून एक प्रत तिच्या रेकॉर्डसाठी ठेवण्यात येईल आणि स्क्रोल्सच्या उरलेल्या प्रती व पेन्शनरांनी परिच्छेद १४ ते १४.३ खाली द्यावयाची प्रमाणपत्रे व पेन्शन पेमेंट ॲडवाइस लिंक ब्रँचकडे पाठविण्यात येतील. | जोडपत्र ४ मध्ये दिलेल्या विहित केलेल्या नमुन्यामध्ये प्रदानकर्ता शाखा स्क्रोल्सच्या पाच प्रति तयार करील. ह्या स्क्रोल्सच्या चार प्रती प्रदानकर्ता शाखा, त्या - त्या क्षेत्रातील (म्हणजे, पुदुचेरी, कराइकल, माहे, यानम) मुख्य शाखांना पाठवील. परिच्छेद १४ ते १४.३ खाली, ह्या प्रती दररोज व त्या सूचनेवर प्रदानाचे प्रमाणपत्र नोंदून पेन्शनरांद्वारा दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रांसह पाठविल्या जातील. |
| ३ | ११ | सर्व प्रदानकर्ता शाखांकडून पेमेंट ॲडव्हाइस, स्क्रोलच्या तीन प्रती व इतर आवश्यक कागदपत्रे मिळाल्यावर, लिंक ब्रँच, प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत, स्क्रोलच्या दोन प्रती, पूरक कागदपत्रे, समरी शीट व पेन्शनरांच्या वतीने रक्कम मिळाल्याची सरकारची पावती पुदुचेरीच्या भारतीय स्टेट बँकेकडे पाठवील. स्क्रोल्सची तिसरी प्रत व प्रदानकर्ता शाखांकडून आलेले पेमेंट ॲडव्हाइस संबंधित लिंक ब्रँच स्वतःकडेच ठेवील. | सर्व प्रदानकर्ता शाखांकडून पेमेंट ॲडव्हाइस, स्क्रोल्सच्या चार प्रती व आवश्यक ती पूरक कागदपत्रे मिळाल्यावर, त्या - त्या क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची मुख्य शाखा, दररोज स्क्रोल्सच्या तीन प्रती, समरी शीट, पेन्शनरांच्या वतीने रक्कम मिळाल्याची पावती, संबंधित कोषागार/उपकोषागारांकडे पाठवील. स्क्रोलची चौथी प्रत व प्रदानकर्ता शाखेकडून मिळालेले पेमेंट ॲडव्हाइस, संबंधित मुख्य शाखेकडून स्वतःकडे ठेवण्यात येतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | ११.१ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकेकडून स्क्रोल इत्यादि मिळाल्यानंतर, लिंक ब्रँच, पुदुचेरीची भारतीय स्टेट बँक, तो स्क्रोल तपासून सर्व बाबतीत परिपूर्ण असल्याची व त्यातील प्रत्येक प्रदानासाठी संबंधित प्रमाणपत्रे असल्याची खात्री करुन घेतील. त्यानंतर, त्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकेने वाटप केलेल्या पेन्शनच्या एकूण रक्कम, पुदुचेरी सरकारी खात्यात डेबिट करुन त्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकेला परत देण्यात येईल. डेबिट ॲडव्हाइसची एक प्रत, स्क्रोल्सच्या दोन्हीही प्रती व लिंक ब्रँचकडून मिळालेले इतर पूरक कागदपत्र, भारतीय स्टेट बँकेकडून डेप्युटी डायरेक्टर ऑफ अकाऊंट्स अँड ट्रेझरीज, पेन्शन विभाग, पुदुचेरी ह्यांचेकडे पाठविले जातील. | ट्रेझरी ऑफिस/सबट्रेझरी ऑफिस पुदुचेरी/कायकल/माहे/यानम ह्यांच्याद्वारे मुख्य शाखेकडून स्क्रोल इत्यादि मिळाल्यानंतर, ट्रेझरी ऑफिसर्स/सबट्रेझरी ऑफिसर्स, ते स्क्रोल्स सर्व बाबतीत परिपूर्ण आहेत व प्रत्येक प्रदानासाठी संबंधित प्रमाणपत्रे आहेत ह्याची खात्री करण्यासाठी तपासून पाहतील, तसेच संबंधित मुख्य शाखेकडे रिटर्न पाठविण्याबाबत चूक नसलेल्या स्क्रोलच्या दोन प्रती पाठवतील. महिन्याच्या शेवटच्या कामाच्या दिवशी मुख्य शाखा मासिक पेमेंट स्क्रोलच्या दिवसनिहाय ५ प्रति तयार करतील व ट्रेझरी ऑफिस/सबट्रेझरी ऑफिसकडे पडताळून करण्यासाठी पाठवतील तसेच ट्रेझरी ऑफिसर/सबट्रेझरी ऑफिसद्वारा प्रमाणित केलेल्या व्हीडीएमएसच्या दोन प्रती, त्या मिळाल्याच्या दो दिवसांच्या आत मुख्य शाखेकडे पाठवतील आणि मुख्य शाखेने ते व्हीडीएमएस त्याच दिवशी लिंक ऑफिसकडे फॅक्सने पाठवावयाचे आहेत. लिंक ऑफिस ते व्हीडीएमएस एकत्रित करुन ते पीएडीकडे रिएंबर्समेंटसाठी पुढील महिन्याच्या ८ तारखेपर्यंत पाठवील. |

**२३. प्राधिकृत बँकांमधून पेन्शनचे प्रदान - पेन्शनराने चालविलेल्या संयुक्त खात्यामध्ये पेन्शन जमा करणे.**

**(संदर्भ. डीजीबीए.जीएडी.क्र.११६५३/४५.०५.०१३/२००७-०८ दिनांक मे ६, २००८)**

महाराष्ट्र सरकारने त्यांच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याची योजना सुधारित केली असून आता त्या पेन्शनराने, त्याच्या कुटुंबातील सभासदांसह चालविल्या, व पीपीओमध्ये त्या सभादांच्या नावे प्राधिकराण केलेल्या संयुक्त खात्यांमध्येही ती जमा करता येते. त्यासाठी पुढील अटी व शर्ती आहेत. : -

(अ) त्या पेन्शनराचे संयुक्त खाते “आधिचा किंवा जीवित” किंवा “दोघांपैकी एक किंवा जीवित” अशा तऱ्हेने चालविले जात असावे.

(ब) पेन्शनराच्या खात्यात पेन्शन जमा झाल्यावर सरकारची जबाबदारी संपेल. संयुक्त खातेदाराने चुकीने किंवा पेन्शनराच्या गैरहजेरीत त्या खात्यातून रक्कम काढल्यास त्यासाठी तो पेन्शनरच जबाबदार असेल.

(क) पेन्शन हे केवळ त्या पेन्शनराच्या हयातीतच दिले जात असल्याने, त्याच्या/तिच्या मृत्युबाबत प्रदान व लेखा अधिकारी/कोषाधिकारी/बँक/ह्यांना त्याबाबत लवकरात लवकर व कोणत्याही परिस्थितीत मृत्युनंतर एक महिन्याच्या आत कळविले जावे. पेन्शनराचा मृत्यु झाल्यास कोषाधिकारी कार्यालयाच्या सूचनेनुसार बँक, त्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे बंद करेल.

(ड) पेन्शनराच्या संयुक्त खात्याला नामनिर्देशित नसल्यास, त्याचा/तिचा मृत्यु झाल्यावर त्या संयुक्त खात्यातील शिल्लक रक्क्म, एखाद्या सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या वारसा प्रमाणपत्राशिवाय काढता येणार नाही. तथापि, त्या संयुक्त खात्यातून चुकीने काढलेली अतिरिक्त रक्कम ही फॅमिली पेन्शन खात्यातून किंवा त्या पेन्शनराच्या कोणत्याही संयुक्त खात्यातून किंवा त्याच्या/तिच्या संयुक्त खातेदाराच्या वैय्यक्तिक खात्यातून वसूल केली जाईल.

(इ) पेन्शनराचा मृत्यु झाल्यानंतरही पुरेशा माहितीच्या अभावी, पेन्शनची रक्कम त्या खात्यात जमा झाल्यास व ती रक्कम त्या खात्यात पडून राहिल्यास, ती पेन्शनची रक्कम बँकेकडून सरकारला परत केली जाईल.

सध्याच्या पेन्शनरांना त्यांची पेन्शन त्यांच्या संयुक्त खात्यात जमा करावयाची इच्छा असल्यास

त्यांनी, त्यांना जेथून पेन्शन मिळते त्या पे अँड अकाऊंट्स ऑफिसर, मुंबई/ट्रेझरी ऑफिसरकडे, विहित नमुन्यात अर्ज करावा. मात्र त्या पेन्शनरांनी/ संयुक्त खातेदारांनी सरकारी आदेशात असलेल्या अटी व शर्तींचा स्वीकार केलेला असावा पेन्शनराकडून तसे घोषणापत्र/हमी मिळाल्यानंतर, संबंधित पे अँड अकाऊंट्स ऑफिसर मुंबई/ट्रेझरी ऑफिसर, त्या पेन्शनराचे संयुक्त खाते चालवू देण्याबाबत बँकांना आदेश देतील.

**२४. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे उत्तर प्रदेश सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याची योजना - एखाद्या पेन्शनराने त्याच्या/तिच्या पती/पत्नी समवेत चालविलेल्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे.**

**(संदर्भ. डीजीबीए.जीएडी. क्र. एच १२४९९/४५.०५.०१०/ २००७-०८ दिनांक जून ४, २००८)**

उत्तर प्रदेश सरकारने पेन्शन देण्याची योजना क्रेंद्र सरकारच्या पेन्शन योजने प्रमाणेच सुधारित केली असून, ती पेन्शनरच्या वैय्यक्तिक खात्यात किंवा त्याच्या/तिच्या पतीसमवेत चालविल्या जाणाऱ्या संयुक्त खात्यातही जमा केली जाऊ शकते. मात्र त्यासाठी पुढील अटी व शर्ती आहेत. : -

(अ) पेन्शनराच्या बँक खात्यात पेन्शन जमा झाल्यावर सरकारची जबाबदारी संपते. पेन्शनराच्या पती/पत्नीने अनियमित/चुकीने त्यातून पैसे काढल्यास सरकार जबाबदार नसेल.

(ब) पेन्शनराचा मृत्यु झाल्यास त्याबाबत एक महिन्याच्या आत कोषागार कार्यालयास कळविले जाईल व त्यामुळे कोषागार कार्यालयाकडून मासिक पेन्शन त्या संयुक्त खात्यात जमा करणे बंद केले जाईल. तथापि त्या खात्यात चुकीने काही रक्कम जमा केली गेली असल्यास ती रक्कम त्या संयुक्त खात्यातून किंवा त्या पेन्शनरने ठेवलेल्या वैय्यक्तिक/संयुक्त खात्यातून वसूल केली जाईल. अशा अनियमित प्रदानाच्या बाबतीत कायदेशीर वारस, वारस, एक्झिक्युटर्सनाही हे लागु असेल.

(क) ही सुविधा सध्या अस्तित्वात असलेल्या/भावी पेन्शनरांनाही लागु आहे.

सध्याच्या पेन्शनरांना अशा संयुक्त खात्यात पेन्शन जमा करावयाची इच्छा असल्यास त्यांनी त्यांना जेथून पेन्शन मिळते त्या ट्रेझरी/बँकेकडे अर्ज करावा.

जुलै १९, २००१ चा सरकारी आदेश व त्यासह डिसेंबर १६, १९९६ व एप्रिल ६, १९८५ चे सरकारी आदेश हे वरील सरकार आदेशानुसार सुधारित केले गेल्याचे समजण्यात यावे.

**२५. उत्तराखंड सरकारच्या पेन्शनरांना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधून पेन्शन प्रदान करण्याची योजना - पेन्शनराने त्याच्या/तिच्या फॅमिली पेन्शनर/नामनिर्देशासमवेत चालविलेल्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे.**

**(संदर्भ. डीजीबीए.जीएडी. क्र. एच १२६५६/४५.०५.०१०/ २००७-०८ दिनांक जून ५, २००८)**

उत्तराखंड सरकारने त्यांच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याची योजना सुधारित केली असून त्यांच्या स्वतःच्या नावाने तसेच पीपीओमध्ये निर्देश केलेले त्यांचे फॅमिली पेन्शनर/नामनिर्देशित ह्यांच्यासह असलेले संयुक्त खाते उघडण्यास, पुढील अटी व शर्तींवर परवानगी दिली आहे. : -

(अ) पेन्शनरांच्या संबंधित बँक खात्यात पेन्शन जमा केल्यावर सरकारची/संबंधित बँकेची जबाबदारी संपते. तथापि, त्या संयुक्त खात्यामधून फॅमिली पेन्शनरने (पती/पत्नी इत्यादि) किंवा पीपीओ अनुसार त्या पेन्शनराने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीने चुकीने पैसे काढल्यास त्यासाठी केवळ ती पेन्शनर व्यक्ती/संयुक्त खातेदार हेच जबाबदार राहतील.

(ब) पेन्शन हे केवळ पेन्शनराच्या हयातीतच दिले जात असल्याने, त्याचा/तिचा मृत्यु झाल्यास ह्याबाबत संबंधित बँकेला/ट्रेझरीला लवकरात लवकर कळविले जावे. त्यामुळे कोषागार कार्यालय मासिक पेन्शन संयुक्त खात्यात जमा करणे थांबवेल. तथापि, पेन्शनराचा मृत्यु झाल्यावर काही रक्कम त्या संयुक्त खात्यात चुकीने जमा केली गेल्यास, ती रक्कम त्या संयुक्त खातेदाराकडून (पति/पत्नी/नामनिर्देशित) कोषागाराकडे परत केली जाईल. पेन्शनराचा मृत्यु झाल्यानंतर जमा केली गेलेली रक्कम परत करण्यास संयुक्त खातेदार, कायदेशीर वारस, वारस, नामनिर्देशित जबाबदार ठरतील.

(क) पेन्शनराच्या एकमेव (सिंगल) खात्याबाबतचा दि. ०८.११.१९८५ चा आदेश वरील आदेशानुसार सुधारित केल्याचे समजले जाईल व इतर अटी व शर्ती तशाच राहतील.

भविष्यात सेवानिवृत्त होणाऱ्यांना संयुक्त खाते उघडावयाचे असल्यास त्यांना निवृत्तीवेतन विनंतीसह सोबत फॉर्म - १ सादर करावा. तथापि, सध्या अस्तित्वात असलेल्या व कोषागारामधून पेन्शन घेणाऱ्या पेन्शनरांना मात्र विहित केलेल्या फॉर्ममध्ये कोषागार/बँकेकडे अर्ज करुन संयुक्त खाते उघडता येईल.

**२६. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधून पश्चिम बंगाल सरकारच्या पेन्शनचे वाटप - पेन्शन स्लिप देणे.**

**(संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच १२७०४/४५.०५.००५/२००७-०८ दिनांक जून ११, २००८)**

पश्चिम बंगाल सरकारने केंद्र सरकार (नागरी) सेवानिवृत्तांना लागु असलेल्या सध्याच्या प्रणालीनुसार त्यांच्या राज्यातील पेन्शनरांना पेन्शन स्लिप्स देण्याचे ठरविले आहे. त्यानुसार, सर्व प्रतिनिधी बँकांना कळविण्यात आले होते की त्यांनी त्यांच्या पेन्शन देणाऱ्या शाखांना, पेन्शन सुरु झाल्यावर व त्यानंतर पेन्शनच्या रकमेत बदल झाल्यावर पेन्शनरांना पेन्शन पेस्लिप्स द्याव्यात.

**२७. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधून ओरिसा सरकारच्या पेन्शनरांना पेन्शनचे प्रदान - पेन्शनराने त्याच्या / तिच्या पत्नी / पती समवेत चालविलेल्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे.**

**(संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच १३०२४ /४५.०५.००६/२००७-०८ दिनांक जून २४, २००८)**

ओरिसा सरकारने ह्या योजनेमध्ये बदल केला असून आता, पेन्शनर व त्याची/तिचा पत्नी/पतीसह चालविलेल्या संयुक्त खात्यात, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधून पेन्शन जमा करण्याची सुविधा देऊ केली आहे. पेन्शनराने उघडलेले असे संयुक्त खाते "पूर्वीचा किंवा जीवित" किंवा "दोन्हीही किंवा जीवित" ह्या धर्तीवर चालविता येईल. मात्र त्यासाठी पुढील अटी व शर्ती लागू होतील. : -

(अ) पेन्शनराच्या बँक खात्यात पेन्शन जमा झाल्यावर सरकार/बँकेची जबाबदारी संपते पती/पत्नीने चुकून पेन्शन काढले तरी पुढील कोणतीही जबाबदारी सरकार/बँकेची नसेल.

(ब) पेन्शनराचा मृत्यु झाल्यास त्याबाबत एक महिन्याच्या आत कोषागार कार्यालयास कळविले जाईल व त्यामुळे कोषागार कार्यालयाकडून मासिक पेन्शन त्या संयुक्त खात्यात जमा करणे बंद केले जाईल. तथापि त्या खात्यात चुकीने काही रक्कम जमा केली गेली

असल्यास ती रक्कम त्या संयुक्त खात्यातून किंवा त्या पेन्शनरने ठेवलेल्या वैय्यक्तिक/संयुक्त खात्यातून वसूल केली जाईल. अशा अनियमित प्रदानाच्या बाबतीत कायदेशीर वारस, वारस, एक्झिक्युटर्सनाही हे लागु असेल.

पेन्शनराच्या खात्यात/संयुक्त खात्यात अतिरिक्त रक्कम जमा केली गेल्यास, ती परत करण्यास, पेन्शनराचे कायदेशीर वारस, वारस, एक्झिक्युटर्स जबाबदार असतील अशा अर्थाचे हमीपत्र पेन्शनरांना द्यावे लागेल.

(क) पेन्शनराची पत्नी/पती हाच नामनिर्देशित असल्यास पेन्शनची थकबाकी पेन्शनराच्या पती/पत्नीसह उघडलेल्या संयुक्त खात्यात जमा होत राहील. परंतु त्यासाठी ओरिसा ट्रेझरी कोड व्हॉल्युम १ ला परिशिष्टामधील नोट - ए अनुसार ते ''स्वीकृत नामनिर्देशन'' असले पाहिजे.

सध्या अस्तित्वात असलेल्या पेन्शनरांना वर निर्देश केल्याप्रमाणे त्यांचे पेन्शन संयुक्त खात्यात जमा करण्याची इच्छा असल्यास, त्यांनी ते सध्या जेथून पेन्शन घेत आहेत त्या बँक शाखेकडे विहित नमुन्यात अर्ज करावा. ह्या अर्जावर पेन्शनराच्या पत्नी/पतीनेही, ह्या विभागीय कार्यालयाच्या मेमोरँडम क्र. २६८४८ दि. २४.०५.२००८. मधील अटी व शर्ती स्वीकारल्याची खूण म्हणून सही करावी. मेमोरँड क्र. टीआरडी - २२/०७ २६८४८/एफ दि. मे २४, २००८ दिल्या गेल्यानंतर निवृत्त होणाऱ्या पेन्शनरांनाही हे निदेश लागु होतील.

**२८. गोवा सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन वाटप - पेन्शन स्लिप देणे.**

**(संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.९२४/४५.०५.०१२/२००८-०९ दिनांक जुलै २३, २००८)**

स्टेट फायनान्शियल सेक्रेटरीज च्या मेळाव्यामध्ये, केंद्र सरकारच्या पेन्शनरांप्रमाणेच राज्य सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन स्लिप्स देण्याचा प्रश्न चर्चिला गेला. गोवा सरकारने ठरविले की, केंद्र सरकारच्या पेन्शनरांबाबतीत केले जात आहे त्याप्रमाणेच त्यांच्याही पेन्शनरांना, आवश्यक त्या नमुन्यात, पेन्शन सुरु झाल्यावर व त्यानंतर पेन्शनच्या रकमेत बदल झाल्यानंतर पेन्शन स्लिप्स दिल्या जाव्यात. त्यानुसार सर्व प्रतिनिधी बँकांना त्यांच्या पेन्शन - वाटप करणाऱ्या शाखांना तशा सूचना देण्याबाबत सांगण्यात आले आहे.

**२९. प्राधिकृत बँकांमधून टेलिकॉम विभागाच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याची योजना :- पेन्शनर व त्याची / तिचा पत्नी / पती ह्यांच्या संयुक्त बँक खात्यात पेन्शन जमा करणे.**

**(संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१९१७/४५.०४.००१/२००८-०९ दिनांक ऑगस्ट २१, २००८)**

सेंट्रल पेन्शन अकाऊंटिंग ऑफिसच्या (सीपीएओ) सल्ल्यानुसार ठरविण्यात आले आहे की, डीओटी/एक्स-डीओटी, डीटीएस अँड डीटीओने (बीएसएनएलमध्ये समावून घेतलेले) चालविलेल्या संयुक्त खात्यातही पेन्शन जमा करण्यास परवानगी दिली गेली आहे. तसेच, पेन्शन पेमेंट ऑर्डरमध्ये (पीपीओ) ज्याच्या/जिच्या नावे फॅमिली पेन्शन प्राधिकृत केली आहे अशा त्याच्या/तिच्या पत्नी/पतीसह असलेल्य संयुक्त खात्यातही ती जमा करता येईल. पेन्शनरने त्याच्या/तिच्या पत्नी/पतीसह उघडलेले संयुक्त खाते ''पूर्वीचा किंवा जीवित'' अथवा ''दोन्हीही पैकी एक किंवा जीवित'' ह्या धर्तीवर चालविता येईल. मात्र त्यासाठी, भारत सरकारच्या दळणवळण व आय.टी.मंत्रालय, दूरसंचार विभाग, नवी दिल्ली ह्यांच्या काही अटी व शर्ती लागु होतील. सर्व प्रतिनिधी बँकांना, त्यांच्या पेन्शन वाटप करणाऱ्या शाखांना त्यानुसार सूचना देण्यास सांगण्यात आले आहे.

**३०. प्राधिकृत बँकांद्वारे आंध्रप्रदेश सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान कराण्याची योजना - पेन्शनर व त्याची/तिचा पत्नी/पती ह्यांनी चालविलेल्या संयुक्त पेन्शन खात्यात पेन्शन जमा करणे.**

**(संदर्भ. डीजीबीए.जीएडी.क्र.१९१८/४५.०५.०१६/२००८-०९ दिनांक ऑगस्ट २१, २००८)**

आंध्रप्रदेश सरकारने पेन्शन व त्याची/तिचा पत्नी/पती ह्यांच्या संयुक्त पेन्शन खात्यात पेन्शन जमा करण्यास संमती दिली असून त्यासाठी, आंध्रप्रदेश सरकारच्या आदेशात सविस्तर वर्णन केल्याप्रमाणे पेन्शनराची पत्नी/पतीने एक हमीपत्र देण्याची अट आहे. त्यानुसार सर्व प्रतिनिधी बँकांनी त्यांच्या पेन्शन वाटप करणाऱ्या शाखांना योग्य त्या सूचना द्याव्यात.

**३१. प्रभाकर राव समितीच्या ग्राहक सेवेवरील शिफारशी - पेन्शन प्रदान करणे.**

**(संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-३०८५/४५.०१.००१/२००८-०९ दिनांक ऑक्टोबर १,२००८)**

पेन्शन प्रदानासंबंधाने प्रभाकर राव समितीने केलेल्या शिफारशी स्वीकारण्याचे ठरविण्यात आले असून त्यानुसार सर्व प्रतिनिधी बँकांना सल्ला देण्यात आला आहे की त्यांनी, त्यांच्या शाखांना ह्या शिफारशींचे अनुपालन करावे, तसेच त्यांच्या अंतर्गत लेखा तपासनिसांना/निरीक्षकांनाही दिलेल्या चेक लिस्टनुसार कामाच्या बाबींसंबंधाने अनुपालन होत आहे इकडे लक्ष देण्यास सांगावे, तसेच रिझर्व बँकेचे निरीक्षक अधिकारी भेट देतील तेव्हा त्यांच्या अहवालातील ग्राहकसेवेच्या दर्जावर टीका - टिप्पणी करण्यासाठी ते उपलब्ध करावेत.

**३२. सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींवरील सरकारच्या निर्णयाची अंमलबजावणी :- २००६ पूर्व पेन्शनर्स / फॅमिली पेन्शनर्स ह्यांच्या पेन्शनमध्ये सुधारणा.**

**(संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-३६९९/४५.०१.००१/२००८-०९ दिनांक ऑक्टोबर १७, २००८)**

भारत सरकार, मनुष्यबळ मंत्रालय, सार्वजनिक तक्रारी व पेन्शन्स, नवी दिल्ली ह्यांनी त्यांचे पत्र क्र.३८/३७/०८-पी अँड पी डब्ल्यु(ए) दि. सप्टेंबर १, २००८. अन्वये, जानेवारी २००६ पासून, सर्व २००६ पूर्व पेन्शनर्स/फॅमिली पेन्शनर्सच्या पेन्शन/फॅमिली पेन्शनचे विनियमन करण्यास मंजुरी दिली आहे. हे आदेश सेंट्रल सिव्हिल सर्व्हिसेस (पेन्शन) रुल्स १९७२ खाली, १ जानेवारी २००८ रोजी किंवा त्यानंतर पेन्शन/फॅमिली पेन्शन मिळवणाऱ्या सर्व पेन्शनरांना/फॅमिली पेन्शनरांना लागु आहेत. तसेच ते आदेश, सीसीएस (एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी पेन्शन) रुल्स व रेल्वे पेन्शनर व ऑल इंडिया सर्व्हिसेसचे पेन्शनर्स तसेच १ जानेवारी, १९७३ रोजी किंवा त्यानंतर इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनाही लागु आहेत. हे आदेश सेवानिवृत्त झालेल्या उच्च व सर्वोच्च न्यायाधीशांना व इतर संविधानात्मक/वैधानिक प्राधिकरणांना लागु नाहीत कारण त्यांचे पेन्शन निराळ्या नियमांनुसार/आदेशानुसार दिले जाते.

त्यानुसार सर्व प्रतिनिधी बँकांना कळविण्यात आले की त्यांनी पेन्शनरांना पेन्शनचे वाटप करताना सरकारने केलेल्या शिफारशींचे अनुपालन करण्यासाठी योग्य त्या सूचना द्याव्यात.

**३३. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे केंद्र सरकार/नागरी संरक्षण/रेल्वे/टेलिकॉम/स्वातंत्र्य सैनिक/राज्य सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन वाटप करण्याची योजना : पीएसबी द्वारा पेन्शन वेगवेगळ्या वेळी दिली जाणे.**

**(संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच - ७६५२/ ४५.०५.०३१/२००८-०९ दिनांक मार्च ३, २००९)**

प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या चार दिवसांमध्ये पेन्शन दिली न जाण्याबाबतच्या अनेक तक्रारी आमच्याकडे पेन्शनरांकडून येत आहेत. त्याऐवजी, प्रतिनिधी बँकांद्वारे, महिन्याच्या शेवटच्या दिवशीच पेन्शन वाटप केले जात असल्याने त्याचा पेन्शनरांना खूप त्रास होतो व त्यांना बराच काळ रांगेत उभे रहावे लागते.

ह्या बाबतीत, आम्ही आमचे परिपत्रक जीए.एनबी. क्र.३०७/४५.०१.००१/९४-९५ दि. जून १, १९९५ मध्ये दिलेले निदेश पुनश्च कळविले असून त्यानुसार सर्व प्रतिनिधी बँकांनी पेन्शन वाटपाचे काम महिन्याच्या शेवटच्या चार कामांच्या दिवसात करावे असा सल्ला दिला होता. मात्र मार्च महिन्यासाठीचे पेन्शन एप्रिल महिन्याच्या पहिल्या कामाच्या दिवशी किंवा त्यानंतर दिले जावे.

**३४. प्रतिनिधी बँकांच्या पेन्शन प्रदान करणाऱ्या शाखांद्वारे पेन्शन स्लिप्स दिल्या जाणे / पेन्शन पेमेंट ऑर्डर्स अद्यावत केल्या जाणे.**

**(संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-९३२६ /४४.०१.००१/२००८-०९, दिनांक एप्रिल २९, २००९)**

पेन्शन स्लिप्स देणे व पीपीओ अद्यावत करणे ह्याबाबत प्रतिनिधी बँकांना योग्य त्या सूचना दिल्या गेल्या होत्या तरीहि, पेन्शन प्रदान करणाऱ्या बँका पेन्शन स्लिप्स देत नसल्याच्या तक्रारी पेन्शनर्स असोसिएशनकडून आमच्याकडे येत आहेत. त्यांनी अशीही तक्रार केली आहे की, संबंधित सरकारी विभागाकडून पेन्शनच्या मूळ दरात फरक कळविला गेल्यावरही, पेन्शन प्रदान करणाऱ्या शाखा पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ) च्या दोन्हीही भागांवर अद्यावत माहिती देत नाहीत. ह्यामुळे आम्ही सर्व प्रादेशिक कार्यालयांना कळविले आहे की, त्यांनी पीएडीमधील सर्व निरीक्षक अधिकारी पेन्शन स्लिप्स व पीपीओ अद्यावत करण्याच्या प्रश्नात लक्ष घालत असल्याची व प्रतिनिधी बँकांची तपासणी करतेवेळी ह्याबाबत खास टीपा - टिपणी देत असल्याची खात्री करुन घ्यावी.

**३५. पेन्शनची अतिरिक्त रक्कम सरकारी खात्याकडे परत करणे.**

**(संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१०४५० /४५.०३.००१/२००८-०९, दिनांक जून १, २००९)**

भारत सरकारकडून आम्हाला कळविण्यात आले आहे की, बँकांद्वारे पेन्शनची दिली गेलेली अतिरिक्त रक्कम त्या बँकांकडून सरकारी खात्यात एकर कमी जमा न केली जाता ती रक्कम पेन्शनरांकडून वसूल होईल तशी हप्त्या - हप्त्याने जमा केली जात आहे. ह्यामुळे सरकारचे नुकसान होत असल्याने सर्व प्रतिनिधी बँकांना कळाविण्यात येत आहे की जेव्हा - जेव्हा अतिरिक्त प्रदान केल्याचे दिसून येईल तेव्हा, ती सर्व रक्कम सरकारी खात्यात ताबडतोब एकर कमी जमा केली जावी.

**३६. केरळ सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन वाटप — पेन्शन/स्लिप देणे**
**(संदर्भ -डीजीबीए.जीएडी.क्र.एच.२०९०/४५.०५.०१५/२००९-१० दि. सप्टेंबर. १, २००९ )**

केंद्र सरकारच्या पेन्शनरांना दिल्या जाणाऱ्या पेन्शनीप्रमाणेच पेन्शन स्लिप्स राज्य सरकारच्या पेन्शनरांना देण्याबाबतची बाब, राज्य वित्तीय सचिवांच्या सभेत मांडण्यात आली. केरळ सरकारने ठरविले आहे की,केंद्र सरकारच्या पेन्शनरांप्रमाणेच ह्या पेन्शनरांनाही, आवश्यक त्या नमुन्यामध्ये, पेन्शन सुरु होताना व त्यात बदल झाल्यावर ही पेन्शन स्लिप्स देण्यात याव्यात. सर्व एजन्सी बँकांना, त्यांनी ह्याबाबत त्यांच्या पेन्शन देणाऱ्या शाखांना सुयोग्य सूचना द्याव्यात असे कळविण्यात आले होते.

**३७. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत रेल्वे पेन्शनरांना पेन्शनचे प्रदान - ड्यु व ड्रॉन विवरणपत्रे देणे**
**( संदर्भ -डीजीबीए.जीएडी.क्र.एच.२०८४/४५.०३.००१/२००९-१० दि. सप्टेंबर. १, २००९ )**

रेल्वे मंत्रालय ( रेल्वे मंडळ ) नवी दिलजी ह्यांनी कळविले आहे की, पेन्शन सुधारित झाल्यामुळे पेन्शनरांना दिलेल्या प्रदानांचा तपशील बँका त्या पेन्शनरांना कळवीत नाहीत. त्यामुळे थकबाकी प्रदान करण्याच्या कार्यरीतीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी, रेल्वे मंत्रालयाने आम्हाला विनंती केली आहे की, सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांना सांगण्यात यावे की त्यांनी अशा पेन्शनरांना ''ड्यु व ड्रॉन'' विवरणपत्राची एक प्रत पाठवावी. ह्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांना सांगण्यात येते की, त्यांनी, त्यांच्या पेन्शन वाटप

करणाऱ्या शाखांना, रेल्वेच्या पेन्शनरांना, विहित फॉर्ममध्ये, "ड्यु व ड्रॉन" विवरणपत्र, पेन्शनमध्ये बदल/सुधारणा केली गेली असल्यास पाठवावे. त्यामुळे पेन्शनरांना अडचण येणार नाही.

ह्या बाबतीत त्यांनी केलेली कारवाई रेल्वे मंत्रालय व रिझर्व बँक ह्यांनाही कळविली जावी.

**३८. पेन्शनरांना अधिक/चुकीच्या केलेल्या प्रदानांची वसुली**
**(संदर्भ -डीजीबीए.जीएडी.क्र.एच.२४३४/४५.०५.०३१/२००९-१० दि. सप्टें. १५, २००९ )**

पेन्शनचे अधिकतर केलेल्या रकमेच्या प्रदानाची एकरकमी परतफेड बँका करत नसल्याबाबतचे अनेक संदर्भ सरकार/विभाग ह्यांच्याकडून आले असल्याने आम्ही येथे आमचे दि. १८ एप्रिल १९९९ चे परिपत्रकातील, अधिकतर प्रदान व एकरकमी परतफेडीबाबतच्या सूचना पुनश्च कळवीत आहोत.

**३९. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत, केंद्रीय नागरी/सुरक्षा/रेल्वे/टेलिकॉम/पेन्शनर्स/स्वातंत्र्य सैनिक/राज्य सरकारांचे पेन्शनर्स ह्यांना पेन्शनचे प्रदान – वृद्ध/ आजारी/अपंग/असमर्थ पेन्शनरांसाठी सुविधा**
**( संदर्भ -डीजीबीए.जीएडी.क्र.एच.३१९४/४५.०१.००१/२००९-१०, दि. ऑक्टो. १४, २००९ )**

असे दिसून आले आहे की, कदाचित बँकेचे कर्मचारी व पेन्शनर ह्यांच्या अज्ञानामुळे आरबीआयने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन बँकांद्वारे केले जात नाही. बँकांमधून पेन्शन/फॅमिली पेन्शन काढण्यामध्ये आजारी व असमर्थ अशा पेन्शनरांना येणाऱ्या अडचणींबाबत, आम्ही यापूर्वीच सर्व बँकाना दिलेल्या सूचनांचा पुनरुच्चार केला आहे व आजारी तसेच असमर्थ असलेल्या पेन्शनरांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास सांगितले आहे.

१. चेकवर सही करु न शकण्याएवढा आजारी/बँकेत प्रत्यक्ष येण्यास असमर्थ असा पेन्शनर
२. बँकेत प्रत्यक्ष येऊ न शकणाराच नव्हे तर, शारिरिक दोष/असमर्थता ह्यामुळे चेक/विथड्रॉल फॉर्मवर अंगठ्याचा ठसा उमटवू न शकणारा पेन्शनर

अशा आजारी/वृद्ध/असमर्थ असलेल्या पेन्शनरांना त्यांचे खाते चालविता यावे ह्यासाठी बँकांना पुढील कार्यरीत अवलंबिण्यासाठी सांगण्यात येत आहे.

अ)जेथे जेथे आजारी/वृद्ध पेन्शनरांच्या हाताच्या किंवा पायाच्या अंगठ्याचा ठसा घेतला जाईल तेथे बँकेच्या माहितीच्या दोन व्यक्तिकडून ( व त्यापैकी एक बँकेचा अधिकारी असावा ) त्या ठशाची ओळख पटविली जावी.
ब) जेथे हाताच्या/पायाच्या अंगठ्याचा ठसा उमटविण्यासाठी पेन्शनर असमर्थ असेल व बँकेत प्रत्यक्ष येऊही शकत नसेल तेथे चेक/निकासी फॉर्मवर त्याच्याकडून एक खूण करुन घ्यावी व तिची ओळख दोन स्वतंत्र व्यक्तिकडून घेतली जावी व त्यापैकी एक व्यक्तिच जबाबदार बँक अधिकारी असावी.

त्यानुसार, एजन्सी बँकांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी त्यांच्या शाखांमध्ये, ह्याबाबतच्या सूचना नोटिस बोर्डावर प्रदर्शित कराव्यात. त्यामुळे आजारी व अपंग पेन्शनर ह्या सुविधेचा लाभ घेऊ शकतील. ह्या बाबतीत बँकांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांनाही त्याची जाणीव करुन द्यावी आणि आमच्या वेबसाईट www.rbi.org.in वरील वाटपाबाबतच्या एफएक्यूंचा संदर्भ घ्यावा.

**४०. केंद्र/राज्य सरकारच्या पेन्शनरांना एजन्सी बँकामार्फत पेन्शन वाटप – विलंब**
**(संदर्भ -डीओ.क्र.सीएसडी.सीओ/८७९३/१३.०१.००१/२००९-१० दि. एप्रिल ९, २०१०, डीजीबीए.जीएडी.क्र.एच-४६/४५.०१.००१/२०१०-११ दि. जुलै २, २०१० आणि डीजीबीए.जीएडी.क्र.एच-६२१२ व ६२१३/४५.०१.००१/२०१०-११ दि. मार्च ११, २०११ )**

सुधारित पेन्शन व थकबाकीचे वाटप करण्याबाबतच्या होणाऱ्या विलंबासंबंधाने पेन्शनरांकडून अनेक तयारी आमच्याकडे येत आहेत. ह्याबाबतच्या स्थितीचा आढावा रिझर्व बँकेने घेतला असून, एजन्सी बँकांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत –

१)पेन्शन/थकबाकी किंवा त्याचा एखादा भाग जमा करण्यामधील विलंबासाठी पेन्शन देणाऱ्या बँकांनी, त्या पेन्शनराला, बँकेचा दर अधिक २% दंडात्मक व्याज एवढी रक्कम, ड्यु तारखेनंतर झालेल्या विलंबासाठी भरपाई म्हणून द्यावी आणि ही भरपाई, ऑक्टोबर १, २००८ पासून केल्या गेलेल्या सर्व विलंबित पेन्शनींसाठी, बँक, सुधारित पेन्शन/त्याची थकबाकी देण्यास समर्थ असेल त्या दिवशीच पेन्शनराच्या खात्यात आपोआप जमा झाली पाहिजे – मग पेन्शनराने त्याबाबत दावा केला असो अथवा नसो.

२)पेन्शन देणाऱ्या बँकांना विनंती करण्यात आली आहे की त्यांनी पेन्शन देणाऱ्या प्राधिकरणांकडून पेन्शनचे आदेश थेट व त्वरित मिळवावेत आणि आरबीआयकडील सूचनांची वाट न पाहता प्रदान करावे त्यामुळे सरकारने घोषित केलेले लाभ पेन्शनरांना पुढील महिन्याच्या पेन्शनमध्ये मिळू शकतील.

३)पेन्शन प्रदानांसह ग्राहक सेवेकडे लक्ष देण्याच्या प्रणालीचे पुनरावलोकन करावे.

४)पेन्शनराला दुर्लक्षित झाल्याचे वाटत असल्यास शाखा हाच संदर्भ बिंदु असावा.

५)पेन्शन खाती असलेल्या सर्व शाखांनी, पेन्शनरांना त्यांच्या सर्व बँक व्यवहारांमध्ये मार्गदर्शन व सहाय्य करावे.

६)पेन्शन ठरविण्यासंबंधाने असलेले गणित व इतर माहिती, नेटच्या माध्यामातून पेन्शनरांना वेबसाईटवर किंवा शाखेमध्ये नियतकालिकतेने उपलब्ध असावी आणि अशा व्यवस्थेबाबत पुरेशी जाहिरातहि केली जावी.

७)पेन्शन प्रदानाबाबतच्या एजन्सी कमिशनचे सर्व दावे पाठवितांना त्यासोबत ईडी/सीजीएम – इनचार्ज ऑफ गव्हर्मेंट बिझिनेस ( एसबीआय व तिच्या सहकारी बँकांसाठी ) ह्यांच्याकडील प्रमाणपत्रासह (पेन्शनची रक्कम जमा करण्यात कोणतीही थकबाकी नाही/नियमित पेन्शन/थकबाकी जमा करण्यात विलंब झालेला नाही ) केले जावेत.

**४१. रेल्वे पेन्शनचे प्रदानाची भरपाई ( रिएंबर्समेंट ) करण्यासाठी सिंगल विंडाS सुरु करणे (संदर्भ - डीजीबीए.जीएडी.क्र.एच-६४९३/४५.०३.००१/२०१०-११ दि. मार्च २१, २०११ )**

एप्रिल १, २०११ पासून, बँक ऑफ बरोडा, अलाहाबाद बँक आणि युनायटेड बँक ऑफ इंडिया येथे, रेल्वे पेन्शनचे रि-इंबर्समेंट करण्यासाठी सिंगल विंडो सिस्टिम (एस डब्ल्यु एस ) सुरु करण्यात आली आहे. “रिइंबर्सिंग बँका” म्हणजे आरबीआय (पीएडी) भारतीय स्टेट बँक आणि तिच्या सहकारी बँका, एप्रिल १, २०११ पासून ह्या बँकांनी केलेले रेल्वे पेन्शन रिएंबर्स करणे बंद करतील. तथापि, युनायटेड बँक ऑफ इंडियाने रेल्वे पेन्शन प्रदानांसाठी, एस डब्ल्यु एसची अंमलबजावणी करण्यासाठी जून ३०, २०११ पर्यंत मुदत वाढ मागितली आहे.

---------------------

## महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची सूची

| अनु.क्र. | परिपत्रक क्र. | तारीख | विषय |
|---|---|---|---|
| १. | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-४१६/४५.०१.००३/२००२-०३ | २१.३.२००३ | राज्य सरकारच्या निवृत्तीवेतन धारकांच्या महागाई भत्त्या(डीआर) वगैरेसाठी सरकारी आदेश राज्य सरकारच्या वेबसाइटवर ठेवणे |
| २. | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-५०६/४५.०१.००१/२००२-०३ | १२.४.२००३ | सरकारी निवृत्तीवेतन धारकांना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत निवृत्तीवेतनाचे प्रदान- निवृत्तीवेतन धारकांना महागाई भत्त्याच्या प्रदानातील दिरंगाई कमीत कमी करण्यासाठी सरकारने उचललेली पावले-डीआर वगैरेच्या बाबतीतील सरकारी आदेश भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत पुढे पाठविणे बंद करणे. |
| ३. | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र. ७७०/४५.०१.००३/२००३-०४ | २५.२.२००४ | आरबीआयच्या वेबसाइटवर निवृत्तीवेतनावरील परिपत्रके ठेवणे |
| ४. | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-११३०३/४५.०१.००३/२००५-०६ | ०६.०२.२००६ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत निवृत्तीवेतनाचे वाटप- महागाई भत्त्याचे प्रदान |
| ५. | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-९४/४५.०५.०३१/२००४-०५ | २४.०८.२००६ | नमुना ‘ए’ आणि ‘बी’ मध्ये नामनिर्देशने स्वीकारणे- केंद्रीय नागरी निवृत्तीवेतन |
| ६. | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-३६११/४५.०३.००२/२००५-०६ | १०.१०.२००५ | निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या प्रदानासाठी रेल्वे निवृत्तीवेतन धारकांच्या बाबतीत नामनिर्देशने (नमुना ‘ए’ आणि ‘बी’) स्वीकारणे. |
| ७. | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.६१२-६४४/४५.०१.००१/२००४-०५ | ०७.१०.२००४ | केंद्रीय प्रतिनियुक्तीवर असताना भारत सरकारच्या सेवेतून निवृत्त होणाऱ्या अखिल भारतीय सेवा अधिकाऱ्यांना निवृत्तिवेतन आणि अन्य निवृत्ती लाभांच्या प्रदानासाठी कार्यपध्दतीची अंमलबजावणी. |
| ८. | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र. ८६७-८९९/४५.०२.००१/२००४-०५ | १८.१०.२००४ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत संरक्षण दलातील निवृत्तीवेतन धारकाना निवृत्तीवेतनाचे प्रदान- निवृत्तीवेतन प्रदान लेखपट्टिका सादर करण्यातील दिरंगाई आणि खोटी आणि लबाडीची प्रदाने टाळण्यासाठी पावले. |
| ९. | क्र.आरबीआय/२००५/३३४(संदर्भ. डीजीबीए.जीएडी.क्र.एच-३३८९-३४२१/४५.०२.०१/२००४-०५) | ०६.०१.२००५ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत रेल्वे निवृत्तीवेतन धारकाना निवृत्तीवेतन प्रदान करण्याची योजना- लबाडीची प्रदाने टाळण्यासाठी पावले. |
| १०. | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-३४५२-३४८५/४५.०१.००१/२००४-०५ | ११.०१.२००५ | केंद्रीय नागरी निवृत्तीवेतनाचे प्रदान- निवृत्तीवेतन प्रदान आदेशाच्या दोन्ही अर्धात महागाई भत्त्याची नोंद |
| ११. | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र. ६०७३/४५.०५.०३१/२००४-०५ | ३०.०५.२००५ | एजन्सी बँकांद्वारे रेल्वे निवृत्तीवेतनाचे वाटप |
| १२. | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१०७४६/४५.०३.००१/२००५-०६ | २४.०१.२००६ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत रेल्वे निवृत्तीवेतन धारकाना निवृत्तीवेतन प्रदान |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करण्याची योजना- रेल्वे मंत्रालयातर्फे सात नवीन खंडांच्या एफएज आणि सीएओजची नियुक्ती. |
| १३ | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र. १२७३६/४५.०३.००१/२००५-०६ | २४.०२.२००६ | अधिकृत बँकेमार्फत निवृत्तीवेतनाचे प्रदान - निवृत्तीवेतन धारकाने त्याच्या/तिच्या जोडीदारासमवेत प्रचलन केलेल्या संयुक्त खात्यात निवृत्तीवेतन जमा करणे. |
| १४ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-२१३४/४५.०२.००१/२००६-०७ | ४.०८.२००६ | अधिकृत बँकेमार्फत निवृत्तीवेतनाचे प्रदान - निवृत्तीवेतन धारकाने त्याच्या/तिच्या जोडीदारासमवेत प्रचलन केलेल्या संयुक्त खात्यात निवृत्तीवेतन जमा करणे. |
| १५ | डीजीबीए.जीएडी.क्र. ६९२६/४५.०५.००५/२००६-०७ | ३०.१०.२००६ | पश्चिम बंगाल (भाग-ओ) सरकारच्या निवृत्तीवेतन धारकांना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे निवृत्तीवेतनाचे प्रदान - निवृत्तीवेतन धारकाने त्याच्या / तिच्या जोडीदारासमवेत प्रचलन केलेल्या संयुक्त खात्यात निवृत्तीवेतन जमा करणे. |
| १६ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-८९७३/४५.०५.००३/२००६-०७ | २४.११.२००६ | पंजाब सरकारच्या निवृत्तीवेतन धारकांना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे निवृत्तीवेतनाच्या प्रदानासाठी योजना. |
| १७ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१३८३४/४५.०२.००१/२००६-०७ | १३.०३.२००७ | संरक्षण दलातील निवृत्तीवेतन प्रदानाच्या प्रतिपूर्तीसाठी एक खिडकी योजनेची सुरवात. |
| १८ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१४२७९/४५.०५.०२४/२००६-०७ | २३.०३.२००७ | अधिकृत बँकेमार्फत अरुणाचल प्रदेश सरकारच्या निवृत्तीवेतन धारकांना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे निवृत्तीवेतनाच्या प्रदानाची योजना. |
| १९ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१०९७५/४५.०५.०३१/२००६-०७ | ०९.०१.२००७ | केंद्र सरकारच्या निवृत्तीवेतनाचे सार्वजनिक बँकांद्वारे प्रदान- निवृत्तीवेतनाच्या स्लीप देणे. |
| २० | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१७६६३/४५.०५.०३१/२००६-०७ | १२.०६.२००७ | केंद्र सरकारच्या निवृत्तीवेतनाचे सार्वजनिक बँकांद्वारे प्रदान- संरक्षण दलातील निवृत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतनाच्या स्लीप देणे. |
| २१ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-३८५६/४५.०५.०३१/ २००७-०८ | ०८.१०.२००७ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे केंद्र सरकारच्या पेन्शनचे प्रदान - रेल्वे पेन्शनरांना पेन्शन स्लिप्स देणे. |
| २२ | डीजीबीए.जीएडी.क्र. ७५७०/४५.०५.०१८/ २००७-०८ | १५.०१.२००८ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे आसाम सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याची योजना - पेन्शनर व त्याच्या/तिच्या पत्नी/पती बरोबर चालविलेल्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे. |
| २३ | डीजीबीए.जीएडी.क्र.९०३६/४५.०५.०१७/ २००७-०८ | १९.०२.२००८ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे पुदुचेरी सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याच्या योजनेत सुधारणा |
| २४ | डीजीबीए.जीएडी.क्र.११६५३/४५.०५.०१३/ २००७-०८ | ०६.०५.२००८ | प्राधिकृत बँकांद्वारे पेन्शन प्रदान योजना - पेन्शनरने चालविलेल्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे |
| २५ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच १२४९९/४५.०५.०१०/ २००७-०८ | ०४.०६.२००८ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे उत्तर प्रदेश सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याची योजना - पेन्शनर व त्याच्या/तिच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पत्नी/पती बरोबर चालविलेल्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे |
| २६ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच १२४९९/४५.०५.०१०/ २००७-०८ | ०५.०६.२००८ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे उत्तराखंड सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याची योजना - पेन्शनर व त्याच्या/तिच्या पत्नी/पती बरोबर चालविलेल्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे |
| २७ | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच १२७०४/४५.०५.००५/ २००७-०८ | ११.०६.२००८ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे पश्चिम बंगाल सरकारचे पेन्शन वाटप - पेन्शन स्लिप्स देणे |
| २८ | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच १३०२४/४५.०५.००६/ २००७-०८ | २४.०६.२००८ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे ओरिसा सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याची योजना - पेन्शनर व त्याच्या/तिच्या पत्नी/पती बरोबर चालविलेल्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे |
| २९ | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र. ९२४/४५.०५.०१२/२००८-०९ | २३.०७.२००८ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे गोवा सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन वाटप - पेन्शन स्लिप्स देणे |
| ३० | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१९१७/४५.०४.००१/२००८-०९ | २१.०८.२००८ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे टेलिकॉम पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याची योजना - पेन्शनर व त्याच्या/तिच्या पत्नी/पती बरोबर चालविलेल्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे |
| ३१ | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र. १९१८/४५.०५.०१६/२००८-०९ | २१.०८.२००८ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे आंध्र प्रदेश सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन प्रदान करण्याची योजना - पेन्शनर व त्याच्या/तिच्या पत्नी/पती बरोबर चालविलेल्या संयुक्त खात्यात पेन्शन जमा करणे |
| ३२ | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-३०८५/४५.०१.००१/२००८-०९ | ०१.१०.२००८ | प्रभाकर राव समितीच्या ग्राहक सेवेवरील शिफारशी - पेन्शन प्रदान |
| ३३ | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-३६९९/४५.०१.००१/२००८-०९ | १७.१०.२००८ | सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील सरकारी निर्णयाची अंमलबजावणी - २००६ पूर्व पेन्शनर/फॅमिली पेन्शनर ह्यांच्या पेन्शनमध्ये सुधारणा |
| ३४ | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-७६५२/ ४५.०५.०३१/२००८-०९ | ०३.०३.२००९ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे केंद्र सरकार/नागरी संरक्षण/रेल्वे/टेलिकॉम/स्वातंत्र्य सैनिक/राज्य सरकारच्या पेन्शनरांना पेन्शन वाटप करण्याची योजना : पीएसबी द्वारा पेन्शन वेगवेगळ्या वेळी दिली जाणे. |
| ३५ | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-९३२६ /४४.०१.००१/२००८-०९ | २९.०४.२००९ | प्रतिनिधी बँकांच्या पेन्शन प्रदान करणाऱ्या शाखांद्वारे पेन्शन स्लिप्स दिल्या जाणे / पेन्शन पेमेंट ऑर्डर्स अद्यावत केल्या जाणे |
| ३६ | संदर्भ.डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१०४५०/४५.०३.००१/२००८-०९ | ०१.०६.२००९ | पेन्शनची अतिरिक्त रक्कम सरकारी खात्याकडे परत करणे |
| ३७ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच २०९०/४५.०५.०१५/२००९-१० | ०१.०९.२००९ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत रेल्वे पेन्शनरांना पेन्शनचे प्रदान - ड्यु व ड्रॉन विवरणपत्रे देणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच २०८४/४५.०३.००१/२००९- | ०१.०९.२००९ | पेन्शनरांना अधिक/चुकीच्या केलेल्या प्रदानांची वसुली |
| ३९ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच २४३४ /४५.०५.०३१/ २००९-१० | १५.०९.२००९ | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत, केंद्रीय नागरी/सुरक्षा/रेल्वे/टेलिकॉम/पेन्शनर्स/स्वातंत्र्य सैनिक/राज्य सरकारांचे पेन्शनर्स ह्यांना पेन्शनचे प्रदान — वृद्ध/ आजारी/अपंग/असमर्थ पेन्शनरांसाठी सुविधा |
| ४० | डीजीबीए.जीएडी.क्र.एच ३१९४/४५.०१.००१/२००९-१० | १४.१०.२००९ | केंद्र/राज्य सरकारच्या पेन्शनरांना एजन्सी बँकामार्फत पेन्शन वाटप — विलंब |
| ४१ | डीओ.क्र.सीएसडी.सीओ/८७९३/१३.०१.००१/२००९-१० दि. एप्रिल ९, २०१०, डीजीबीए.जीएडी.क्र.एच-४६/४५.०१.००१/२०१०-११<br>डीजीबीए.जीएडी.क्र.एच-६२१२ व ६२१३/४५.०१.००१/२०१०- | ०९.०४.२०१०<br>०२.०७.२०१०<br>११.०३.२०११ | रेल्वे पेन्शनचे प्रदानाची भरपाई ( रिएंबर्समेंट ) करण्यासाठी सिंगल विंडो सुरु करणे |